
नवनाथांच्या गोष्टी



नवनाथांच्या गोष्टी

लेखक
दिवाकर अनंत घैसास

जय हिंद प्रकाशन

रायकर ब्रदर्स पब्लिशिंग हाऊस प्रा. लि.
२१२, क्रिएटीव्ह इंडस्ट्रीयल सेंटर, ना.म.जोशी मार्ग,
लोअर परेल, मुंबई - ४०० ०११.
दूरध्वनी : २३०७५८ ६७ / २३०७ ५८९९

प्रकाशक :
रायकर ब्रदर्स पब्लिशिंग हाऊस प्रा. लि.
२१२, क्रिएटीव्ह इंडस्ट्रीयल सेंटर,
ना.म.जोशी मार्ग, लोअर परेल, मुंबई - ४०० ०११.
दूरध्वनी : २३०७५८ ६७ / २३०७ ५८९९

प्रथम आवृत्ती : जून १९९२
नवीन आवृत्ती : फेब्रुवारी २०१३

छपाई :
मुद्रण आविष्कार,
१९४–एम्, कात्रक कंपाऊंड,
गायवाडी, गिरगांव, मुंबई–४०० ००४.

लेझरजुळणी :
अक्षय फोटोटाईपसेटर्स
'कुलदीपक', जुन्या महानगरपालिकेजवळ,
सुभाष पथ, ठाणे-४०० ६०१.

अनुक्रमणिका

१. मच्छिंद्राचा जन्मच विलक्षण!

आज कामिक कोळी यमुना नदीवर सकाळी लवकरच खांद्यावर जाळे घेऊन आला होता. जास्त मासे पकडावेत असा त्याचा बेत होता. यमुना हीच त्याची माय माउली होती. मासे पकडावेत आणि ते विकून उपजीविका चालवावी असा त्याचा परिपाठ होता. त्याची पत्नी प्रेमळ होती. दांपत्य सुखाने रहात होते. पण त्या सुखात एक मोठी कमतरता होती! त्यांना पुत्र नव्हता. संसार सफल नव्हता. तरी त्याची पत्नी देवावर श्रद्धा ठेवून समाधानाने राहात असे. पण इतरांची मुले खेळताना पाहून तिला उदास वाटे.

तो कोळी तीराजवळ आला तो त्याला एका अर्भकाचा रडण्याचा आवाज आला. तो भराभर चालत तिकडे गेला. दलदलीची जागा होती. एका मोठ्या अंड्याचे तुकडे झाले होते. टरफलात एक सुंदर बालक ट्याहां ट्याहां करून रडत होता! कामिकाच्या आश्चर्याला पारावार राहिला नाही. त्याने पुढे होऊन पटकन तो मुलगा उचलून हातात घेतला! इकडे तिकडे पाहिले. काही बगळे दलदलीच्या जागी उतरत होते, उतरले होते. काही पंख फडफडवीत उडून जरा दूर जात होते. एवढे मोठे अंडे! या बगळ्यांचे तर नक्कीच नव्हे! मग हे कोणाचे अंडे? आणि मानवी बालक यात कसा?

कामिक कोळी नवल करीत होता. त्याला वाटले, आपण निपुत्रिक म्हणून देवानेच आपल्याला हा पुत्र दिला आहे! त्याच्या डोळ्यातून आनंदाश्रू वाहू लागले! त्याने वर आकाशाकडे पाहिले! खरेच! देवाने त्याला वरदानच दिले होते! तोच आकाशवाणी ऐकू आली!

"कामिका! हा नारायणाचा अंश कवि नांवाचा ऋषी ईश्वरी कार्यासाठी अवतरला आहे. याला स्वतःचा पुत्र समजून वाढव. मच्छिंद्र नांवाने हा प्रसिद्ध योगी होईल."

कामिकाच्या अंगावर रोमांच उभे राहिले! मासे पकडण्याचे जाळे एका खांद्यावर आणि दोन्ही हातात तो बालक घेऊन तो धावतच घरी गेला.

"हे काय? एवढा लहान मुलगा कुणाचा?" त्याला पाहून पत्नीने विचारले. त्याने आकाशवाणी तिला सांगितली. "आपला मुलगा! देवाने दिलेला!" तिला तर प्रेमाने पान्हाच फुटला! शेजारच्या कोळी स्त्रिया जमल्या! झालेला अद्भुत प्रकार ऐकून धन्य धन्य म्हणू लागल्या! कोळ्यांच्या वस्तीत आज मोठा उत्सव केला गेला!

मच्छिंद्र असेच नांव ठेवले त्या बालकाचे! तो हळूहळू मोठा होऊ लागला! देवाच्या कृपेने झालेला मुलगा म्हणून त्याचे सर्वजण लाड करीत. आईवडिलांच्या तर तो काळजाचा तुकडा होता. त्याचे रूपही अप्रतिम होते. शेजारचे कोळी आणि त्यांच्या बायका त्याला प्रेमाने घरी घेऊन जात, त्याला आवडते पदार्थ खायला देत, त्यांना शक्य होते ते चांगले कपडे घालीत. तो विलक्षण मुलगा मधूनच कुठेतरी शून्य मनाने बघत बसे! बापाबरोबर नदीवर गेला, मासे राखण करू लागला तरी त्याचे मन कुठेतरी दुसरीकडे असे! त्याची बापाला थोडीफार मदत होऊ लागली! मधूनच त्याला आठवे, मत्स्यीच्या पोटात आपण कसा प्रवेश केला, शंकर-पार्वती ब्रह्मज्ञानाची चर्चा करीत होते ती आपण कशी ऐकली, मग शंकराने आपल्याला कविनारायण म्हणून कसे ओळखले, त्यापूर्वी श्रीकृष्णाच्या योजनेप्रमाणे नवनारायणानी दिव्य अवतार घ्यायचे कसे ठरले, सारे सारे काही त्याला आठवे. मासे टोपलीत तडफडत होते ते पाहून त्याला दया येई! एक दिवस तर त्याला राहवेना. दया येऊन त्याने टोपलीतले मासे पुन्हा यमुनेच्या पाण्यात सोडून दिले!

२. तपश्चर्येसाठी घर सोडले!

कामिक होडीतून उतरला. त्याने नेमके ते पाहिले! तो रागावला! "मच्छिंद्रा, काय केलेस हे? थांब, तुला चांगला फोडून काढतो!" असे म्हणून त्याने रागाने त्याला धपाटे घातले! मच्छिंद्र रडला नाही! माशांचे जीव त्याने वाचविले होते! त्याने मार सहन केला, पण घरी गेल्यावर रात्री आईबाप झोपल्यावर तो उठला, आणि गुपचूप घराबाहेर पडला. रात्री नदीच्या तीरातीराने तो उत्तरेस जाऊ लागला! किती योजने मागे पडली! तो थकून गेला होता. पुढे चालवत नव्हते. एक मोठे वन लागले. ते बदरिकावन होते! ऋषींची तपस्या करण्याचे पवित्र स्थान होते! तेथे जाताच त्याला थोडे बरे वाटू लागले. तो विश्रांती घेण्यासाठी थांबला. आपले अवतार-कार्य जणू त्याला स्पष्ट दिसत होते. त्याने तिथेच राहायचे ठरविले. कंदमुळे, फळे खावीत, झऱ्याचे पाणी प्यावे, मांडी घालून मनानेच शिवाचे ध्यान करावे! असे तप सुरू केले त्याने. बारा वर्षे झाली. मच्छिंद्र तरुण झाला होता आता! पण खडतर तपाने त्याचे बळ अगदीच नष्टप्राय झाले होते.

ग्लानी येऊन तो निश्चेष्ट पडला होता. त्याला हळूच मृदु हस्त स्पर्श झाल्याचा भास झाला आणि तो भानावर आला. त्याच्यासमोर दत्तात्रेय भगवान् उभे होते! तो चकित झाला! त्याने पुन्हा नीट पाहिले. शंकाच नाही! आपण शिवाची आराधना केली आणि दत्त प्रसन्न झाले!

दत्तानी त्याच्या मस्तकावर आपला वरदहस्त ठेवला. 'मच्छिंद्रा! ऊठ! तुला पुन्हा पूर्ण बल व सामर्थ्य येवो!' असे म्हटले. मच्छिंद्र पुनश्च सशक्त झाला. त्याच्या मुखावर तेज विलसू लागले.

मच्छिंद्र त्यांच्या पाया पडला. त्यांनी मच्छिंद्राला ज्ञानोपदेश केला. शंकरानेही तेथे प्रगट होऊन मच्छिंद्राला आशीर्वाद दिला. दत्तात्रेय व शंकर यांनी मच्छिंद्राला नंतर सर्व सिद्धी दिल्या, विद्या दिल्या, अस्त्रमंत्र शिकविले, कलियुगातील उपासना मार्गाचे कार्य करण्यास सांगितले. इतर आठ ऋषीही दिव्य जन्म घेऊन पृथ्वीवर येणार होते. नाथपंथाची स्थापना करून भक्ती, ज्ञान व योग यांच्या साधकांची मोठी परंपरा निर्माण करण्याचा अधिकार त्यांनी मच्छिंद्राला दिला. नाथपंथाची शृंगी आदी लक्षणे दत्तानी ठरवून दिली. संस्कार पद्धती सांगितली. सहा महिनेपर्यंत बदरिकावनात दत्त व शंकर यांनी त्याला आपल्या सहवासात ठेवले; मग ते अंतर्धान पावले! मच्छिंद्रनाथ दक्षिणेकडे निघाला.

३. मच्छिंद्रनाथाची यात्रा, वंगदेश व रामेश्वर

दक्षिणेत मच्छिंद्रनाथ सप्तशृंगी येथे आला. त्याने योगशास्त्र काव्यरूपात करता यावे म्हणून तेथे देवीची आराधना केली. देवीने त्याला दर्शन दिले व मार्तंड पर्वतावर नेले. तेथे नाग-अश्वत्थ वृक्षावर अनेक देवता बद्ध व मूक स्थितीत होत्या. त्यांना अनुकूल करून घेण्यासाठी देवीने त्याला ब्रह्मगिरीवर जाऊन खडतर तप करण्यास सांगितले. मच्छिंद्राने तसे तप केले पण तो त्यात मूर्च्छित झाला. त्यावेळी सूर्याने त्याला दर्शन दिले व 'आवाहन करताच्र येईन' असे सांगितले. नंतर त्या पर्वतावर सात महिने आणखी तप केल्यावर त्याला मार्तंड पर्वतावरील देवता प्रसन्न झाल्या व काव्यशक्ती प्राप्त होऊन त्याने योगविद्येचा ग्रंथ रचला. शाबरी विद्या त्या ग्रंथात त्याने लिहून ठेवली.

चंद्रगिरी हे गाव वंग देशातले. मच्छिंद्र यात्रा करीत तेथे गेला. सर्वोदय नावाच्या विप्राकडे तो भिक्षेला गेला. सरस्वती ही त्या विप्राची पत्नी. त्यांना संतान नव्हते. मच्छिंद्रनाथाला त्या स्त्रीने आदराने बोलावले व त्याचे पूजन केले. पण त्यावेळी ती रडू लागली. 'संतान नाही' हे रडण्याचे कारण कळले तेव्हा नाथाने तिला आपल्या झोळीतून थोडे भस्म दिले व म्हटले, "संशय न धरता हे भस्म सेवन करा. तुमचा पुत्र म्हणजे हरी नावाच्या ऋषीचा अवतार! तो जन्माला येईल. बारा वर्षांनी मी येईन व त्याला दीक्षा देईन."

नाथ गेला. नवलाची गोष्ट म्हणून तिने आपल्या शेजारणींना हे सांगितले. तेव्हा जादूटोण्याची भीती घालून त्या स्त्रियांनी तिला ते भस्म टाकून देण्यास सांगितले. अंगणात गोमयाची राख, गवत वगैरे टाकण्याची जागा होती तिथे तिने ते भस्म टाकून दिले! नंतर हा प्रसंग ती पार विसरून गेली! पण नाथांची योगशक्ती विलक्षण होती. ती गोष्ट पुढे सांगणार आहे, पण मच्छिंद्रनाथ कोठे गेला, त्याने काय पराक्रम केला, ते आधी पाहू या!

मच्छिंद्रनाथ दक्षिणेत रामेश्वरी गेला. रामाचा सेतू त्याने पाहिला. स्नान केले. समुद्रतीरावर एक वानर बसलेला! तोच पाऊस आला तेव्हा वानराने दगड रचून घर बांधण्यास सुरुवात केली. मच्छिंद्र त्याला हसला. पण तो साक्षात् हनुमंत लहान रूपात तेथे होता याची नाथाला कल्पना नव्हती. वानराने विचारले, "मला हसतोस, तर तू एवढा शहाणा कोण?" नाथ म्हणाला, "मी यती मच्छिंद्र!" "यती म्हणजे काय?" "यती म्हणजे योगशक्ती असलेला!" वानराने म्हटले, "तुझे सामर्थ्य दाखव, नाहीतर यती हे नाव टाकून दे." मच्छिंद्रानेही त्याला आव्हान दिले. मग वानररूपातला मारुती आणि नाथ यांचे मंत्रास्त्रांनी मोठेच युद्ध झाले. त्यात नाथाने मारुतीला डोंगरासकट आकाशात बांधून ठेवले. त्याने आपला पिता वायू याची प्रार्थना केली. पण वायूने मारुतीला मच्छिंद्राशी मैत्री करण्यास

सांगितले. मच्छिंद्रावर गुरुकृपा आहे, तो हरणार नाही असे सांगितले. मग दोघांनी नाथाला नमस्कार केला व परस्परांचे सख्य झाले. मारुती व वायू यांनी नाथाला केव्हाही साह्य करण्याचे वचन दिले! मच्छिंद्रनाथाच्या सामर्थ्याची परीक्षाच हनुमंताने घेतली होती व मग त्याला यश मिळावे म्हणून पराभव स्वीकारला होता.

मारुतीने मच्छिंद्राला एका बाबतीत विनंती केली. तो म्हणाला, "माझे एक काम आहे. धर्मसंकटच आहे. सीतामाईने मजकडून एकदा असे वचन घेतले होते की मी गृहस्थ आश्रम स्वीकारावा, लग्न करून संसार करावा!" मी संकटात सापडलो. रामप्रभूंना शरण गेलो. राक्षसनाशानंतर ज्या स्त्रिया अनाथ झाल्या होत्या त्यांच्या राज्यात जाऊन राहायला त्यांनी मला सांगितले. मी ब्रह्मचारी! लग्न कसे करणार? तेव्हा प्रभू म्हणाले, "तू नुसता भुभु:कार केलास तरी स्त्रियांना गर्भ राहील. तू ब्रह्मचारीच राहशील." प्रभूनी व सीतामाईने मला स्त्रीराज्यात जायला लावले."

मच्छिंद्र म्हणाला, "मग? मला काय काम आहे?"

मारुती म्हणाला, "मी गेलो. तेथे मैनाकिनी म्हणजेच कीलोतला राणी आहे. माझ्या भुभु:काराने त्यांना गर्भ राहिले पण कन्यासंततीच झाली. मैनाकिनीने पुरुषाशी प्रत्यक्ष संबंध हवा म्हणून हट्ट धरला. तो मी पूर्ण करणे शक्य नव्हते.

'उपरिचर वसूचा पुत्र कविनारायण म्हणजे तू – तिची इच्छा पूर्ण करशील' असे वचन मी तिला दिले व माझी सुटका करून घेतली. आता तू तसे कर व मला वचनमुक्त कर."

मच्छिंद्र म्हणाला, "मला तू भलत्याच संकटात टाकणार!"

मारुती म्हणाला, "पुढे तुला व मैनाकिनीला मीननाथ नावाचा पुत्र होणार आहे. हे भविष्य अटळ आहे. तेव्हा तू माझे हे कार्य करच."

मच्छिंद्र म्हणाला, "मी आधी तीर्थयात्रा करून येतो व मग स्त्रीराज्यात जाईन." मारुतीने ते मान्य केले. मग नाथ तीर्थयात्रेला पुढे निघाला.

४. तीर्थयात्रेतील पराक्रम

मच्छिंद्रनाथ यात्रा करीत असता एका अरण्यात अष्ट भैरवांची त्याच्याशी गाठ पडली. त्यांनी त्याला अडविले. हिंगळादेवीचे दर्शन घेण्यासाठी मच्छिंद्र चालला होता. भैरव प्रवेशद्वारापाशीच होते. मच्छिंद्राने त्यांच्याशी घनघोर अस्त्रयुद्ध केले! स्वतःचे शरीर भस्माने त्याने वज्रासारखे कठीण केले आणि भैरवांची सर्व अस्त्रे फुकट गेली. ते बेशुद्ध पडले! हिंगळादेवीच्या दासी 'मातृका' मच्छिंद्रावर मोहनास्त्र टाकण्यासाठी आल्या. पण मच्छिंद्रानेच त्यांच्यावर मोहनास्त्र सोडले व त्या विवस्त्र होऊन, मच्छिंद्रनाथानेच मायेने निर्माण केलेल्या पुरुषांबरोबर वाटेल तशा नाचू लागल्या! मग अस्त्र आवरून घेतले तेव्हा देहभानावर येऊन लाजून देवीकडे परत गेल्या!

देवीने सर्वांना वस्त्रे दिली व मायाशक्तीने मच्छिंद्र कोण ते ओळखून ती सर्वजणींना घेऊन त्याला दर्शन देण्यासाठी त्याच्याजवळ प्रगट झाली. मच्छिंद्राने भैरवांना पुन: उठविले. देवीने मच्छिंद्राला मार्तंड पर्वतावर सर्व सिद्धी दिल्या होत्या. त्यांची आठवण देऊन तिने नाथाच्या योगशक्तीची परीक्षा घेतली. त्याने आपल्या सामर्थ्याने पर्वत आकाशात तरंगत ठेवला व पुन्हा खाली आणला. देवीने प्रसन्न होऊन त्याला स्पर्शास्त्र व भिन्नास्त्र अशी दोन अस्त्रे दिली. देवीचा आशीर्वाद घेऊन नाथ पुढे 'बारा मल्हार' नावाच्या अरण्याकडे गेला.

तेथे रात्री त्याने काही भुते अरण्यातून वेताळाकडे जात आहेत असे पाहिले. स्पर्शास्त्र मारून त्याने त्या भुतांना जमिनीवरच खिळवून ठेवले! वेताळाला हे कळले तेव्हा आणखी काही भुतांना वेताळाने शोध घेण्यास पाठविले. त्यांनी भुते जमिनीला चिकटलेली पाहिली. मच्छिंद्रनाथाला त्यांनी विनंती केली की "भुतांना सोडून द्या, नाहीतर वेताळ रागवेल." पण नाथाने त्यांचे म्हणणे उडवून लावले. तेव्हा त्या भुतांनी वेताळाला सर्व प्रकार सांगितला. वेताळ संतापला. त्याने हजारो भुतांचे सैन्यच नाथावर पाठविले, आणि आपण स्वत:ही युद्धाला आला.

मच्छिंद्रावर सर्वांनी अनेक घोर अस्त्रांचा प्रयोग केला पण मच्छिंद्राने मायाशक्तीने प्रतिकारासाठी आठ दैत्य निर्माण केले व भुतांचा पराभव केला. भूतपती मच्छिंद्राला शरण आले. "शाबरी विद्येतील मंत्रांना देवांचे साहाय्य जसे मिळते तसेच तुमचेही साहाय्य मिळाले पाहिजे" अशी अट त्यांना घालून मच्छिंद्राने त्यांची अस्त्रबंधने सोडली. भूतपतींनी मच्छिंद्राला सर्व मंत्रांचे सर्व उच्चार व अनुष्ठाने शिकविली, आणि भूतबली कोणते द्यावेत तेही सांगितले. मच्छिंद्राने भूतपतींशी केलेल्या युद्धाची कथा वाचणाऱ्यांना भुतांनी त्रास देऊ नये अशी सर्व भूतगणांना आज्ञा केली. मच्छिंद्राशी त्यांनी तसा करार केला. नंतर मच्छिंद्रनाथ कालिकेच्या दर्शनासाठी कोकणात गेला.

५. कालिका, वीरभद्र, वज्रेश्वरी

कोकणात कुडाळ गावाजवळ आडूळ नावाच्या गावी कालिकेचे मंदिर होते. ती देवी म्हणजे शंकराचे अस्त्रच होते. त्या अस्त्राने

शंकराने दैत्यसंहार केला. ते दमले व देवीरूपात शंकराच्या वरदानाने ते तेथे विश्रांती घेत निजले होते. तिला कोणी त्रास देऊ नये अशी शंकराची आज्ञा होती. पण मच्छिंद्राने तिला आवाहन केले. ती जागृत झाली व संतापून मच्छिंद्राशी युद्ध करण्यास आली. तिच्या गर्जनेने त्रैलोक्य भयभीत झाले. पण तिच्या माऱ्याआधी नाथाने तिच्यावर वासवी शक्तीचा प्रयोग केला. त्यानंतर देवीने व नाथाने एकमेकांवर अनेक अस्त्रे फेकली व परस्परांचे मंत्र निष्फळ केले. शेवटी मच्छिंद्राने वाताकर्षण मंत्र योजून कालिकेला निश्चेष्ट पाडले. तिने शंकरांचा धावा केला. तेव्हा शंकर प्रकट झाले. त्यांनी मच्छिंद्राला जवळ घेऊन त्याच्या पराक्रमाचे कौतुक केले. "धन्य बाळा! तू माझे शस्त्र जिंकून घेतलेस!" मग कालिकेला दोघांनी सावध केले. 'कालिका मंत्ररूपाने नाथाच्या जिभेवर सज्ज असेल' असे वरदान नाथाला मिळाले. नाथांच्या मंत्रांत कालिकेचे नाव आले की तो मंत्र कालिका सिद्ध करील असे ठरले. शंकराने कैलासाला प्रयाण केले व मच्छिंद्रनाथ उत्तरेस हरिहरेश्वर तीर्थाकडे गेला.

हरेश्वरास नाथाची व वीरभद्राची गाठ पडली. वीरभद्र मानवरूपात होता. मच्छिंद्राची नाथसंप्रदायाची वस्त्रे व लक्षणे पाहून त्याने त्याची थट्टा उडविली. पण मच्छिंद्राने ताठ उत्तर दिले. त्यामुळे वीरभद्र संतापला. त्याने मूळरूप धारण करून नाथावर बाण सोडला! नाथाने मंत्राने स्वत:भोवती कवच केले होते. वीरभद्राची शस्त्रास्त्रे नाथाला स्पर्शही करू शकली नाहीत. नंतर मच्छिंद्रनाथाने कालास्त्र सोडून वीरभद्राला शरणच आणले. वीरभद्रानेही शाबरी मंत्रांमध्ये स्वत:चे सामर्थ्य ओतण्याचे कबूल केले. सर्व देवांनी व विष्णूनेही 'स्मरण केल्यास साहाय्य करू' असे वचन नाथाला दिले. ब्रह्माविष्णुमहेशांनी नाथाला वर दिले, अस्त्रे दिली, वाचासिद्धी दिली. अग्नी, वरुण, इंद्र, कुबेर, अश्विनीकुमार यांनीही मंत्र दिले.

त्यानंतर मच्छिंद्रनाथ देवांच्या आमंत्रणावरून वैकुंठ, शंकरांचे कैलास व अन्य देवतांच्या स्थानी सात वर्षे राहिला व त्यानंतर पुन्हा पृथ्वीवर आला.

मच्छिंद्राने पश्चिम भारतात यात्रा केली व त्याने वज्रेश्वरी येथील वज्रभगवतीचे दर्शन घेतले. तेथील उष्ण पाण्याची कुंडे पाहिली, त्याने कुंडांचा इतिहास श्रवण केला. मग स्वत: एक कुंड बाणाने व आपोमंत्राने निर्माण केले. ते पाणी अग्नीच्या अस्त्राने उष्ण केले व त्याने देवीला स्नान घातले. तेव्हा वज्रेश्वरी प्रसन्न झाली. वज्र हे नाम कसे प्राप्त झाले ते तिने मच्छिंद्राला सांगितले. "पूर्वी वसिष्ठाच्या यज्ञात इंद्र आला; पण ऋषींनी त्याला उत्थापन दिले नाही. तेव्हा इंद्र रागावला व त्याने वज्र फेकले पण रामाने शक्तिमंत्र जपून दर्भरूपाने इंद्राच्या वज्राचा प्रतिकार केला. त्यावेळी मी दर्भातून प्रकटले व वज्रच गिळून टाकले. इंद्र शरण आला तेव्हा रामाज्ञेने मी ते वज्र इंद्राला परत दिले पण मी मात्र अंतर्धान न पावता प्रकटच राहिले. या भोगावती नदीच्या पाण्याने मला स्नान घालून रामाने इथे माझी प्रतिष्ठापना केली. मच्छिंद्रा, तू आज मला उष्ण जलाने स्नान घातलेस, त्यामुळे मी तुझ्यावर प्रसन्न आहे." असे वज्रदेवीने नाथाला सांगितले.

मच्छिंद्र त्या देवीच्या कृपेस पात्र झाला. तो महिनाभर तेथे राहिला व नंतर उत्तर भारतात तीर्थयात्रेला निघाला.

६. पाशुपत राजाला रामदर्शन

मच्छिंद्रनाथ पुढे द्वारकेला गेला. त्याने गोमती नदीत स्नान केले. नंतर आणखी उत्तरेस अयोध्येला गेला. तेथे रघुवंशातील रामाचा

वंशज पाशुपत नावाचा राजा होता. नगरातील रामाच्या मंदिरात राजा दर्शनासाठी आला होता. त्याच वेळी मच्छिंद्रनाथही दर्शनासाठी मंदिरात शिरू लागला. द्वारपालांनी त्याला अडविले, त्याचा फार अपमान केला. मच्छिंद्राने नोकर व राजा, कोणावरही राग धरला नाही. पण राजावर गुप्तपणे स्पर्शास्त्र टाकले. त्यामुळे देवालयात राजा भूमीवर साष्टांग नमस्कार घालताना जमिनीला चिकटला. त्याला उठता येईना. सर्वत्र गोंधळ झाला. दाराबाहेर तेजःपुंज सिद्धयोगी उभा. लोकांनी ओळखले, याचा अपमान झाला असावा. सर्वजण त्याला शरण आले. तेव्हा नाथाने पुढे होऊन राजाला उठविले. राजाही त्याला शरण आला.

राजाची अशी इच्छा होती की रामाचे दर्शन आपल्याला घडावे. मच्छिंद्राजवळ त्याने आपली इच्छा बोलून दाखविली. मच्छिंद्राने वाताकर्षण मंत्राने प्रत्यक्ष सूर्याला बोलावले. त्याची उष्णता बाधू नये म्हणून जलदास्त्राचा प्रयोग केला. सूर्य निश्चेष्ट झाला. सृष्टिकार्य बंद पडेल म्हणून देवांनी मच्छिंद्राला विनंती केली की 'तू सूर्याला सोड.' मच्छिंद्र म्हणाला – "सूर्यवंशातला हा पाशुपत राजा प्रभू रामचंद्राच्या दर्शनाची इच्छा करीत आहे. रामाचे दर्शन याला आधी घडले पाहिजे, तरच मी सूर्याला मुक्त करीन." देवांनी ते मान्य केले तोंच पाशुपत राजासमोर राम व लक्ष्मण प्रकट झाले. मच्छिंद्राने राजाचे असे समाधान केले. "रामचंद्रा!" तो म्हणाला, "तुझे नाम सर्वश्रेष्ठ आहे. माझ्या शाबरी विद्येतील मंत्र तुझ्या नामाने सफल व्हावेत अशी माझी इच्छा आहे."

राम म्हणाला – "साक्षात् दत्तात्रेयांनी तुला सर्व विद्या दिल्या आहेत. तुझ्या मंत्रात जेथे माझे नाम येईल तो मंत्र सिद्ध झालाच असे समज. आता सूर्यदेवाला तू मुक्त कर."

नाथाने अस्त्र आवरले तसा सूर्य सावध झाला. मच्छिंद्र व सूर्य यांची भेट झाली. सूर्याची दाहकता दूर करण्यासाठी नाथाने चंद्रास्त्र

व पर्जन्यास्त्राचा प्रयोग केला. सूर्याने पाशुपत राजासही दर्शन दिले. नंतर सर्व देवांनी आशीर्वाद दिले व स्वस्थानी प्रयाण केले. सूर्य पुन्हा अरुणासह एकचक्र रथावर गगनात आरूढ झाला आणि मच्छिंद्र व पाशुपत राजा यांनी त्या राममंदिरात रामाचे पूजन केले. नंतर मच्छिंद्र वंगदेशात गेला. तेथे काय घडले?

७. गोरक्षनाथाचा जन्म व गुरुभक्ती

मच्छिंद्रनाथ फिरत फिरत वंग देशात आला. चंद्रगिरी गावात त्याच ब्राह्मणीच्या दारात आज बारा वर्षांनी तो पुन्हा भिक्षा मागण्यासाठी आला होता. तीच स्त्री भिक्षा घालायला बाहेर आली. नाथाने आपण जिला भस्म दिले तीच ही स्त्री अशी खात्री करून घेतली. त्याने मग म्हटले – "माई, बारा वर्षांपूर्वी मी भस्माची चिमूट दिली होती, ती तू सेवन केलीस ना? मग तुझा मुलगा अकरा वर्षांचा असेल, तो कुठे आहे? त्याला बोलाव ना!"

ती स्त्री दचकली! प्रथम तिला आठवलेच नाही, पण मग सारे काही आठवले. 'भस्म! आपण ते न खाता केरात टाकले, राखेत टाकले! हा जोगी तर नेमका समोर आला! आता काय करावे? खोटे बोलावे तर हा आपलेही भस्म करून टाकील! देवा! आता त्यालाच शरण जाऊन क्षमा मागावी! नाहीतर धडगत नाही!' असा विचार करून ती नाथाला शरण आली व खरे काय ते त्याला तिने सांगितले! नाथाला वाईट वाटले पण तो म्हणाला – "तू चुकलीस खरी, पण मला फक्त ती जागा दाखव – कुठे बरे टाकलेस ते भस्म?"

त्या स्त्रीने ते स्थान दाखविले. राखेचा मोठा ढीग! शेण्या, गवत, कचरा – सारे त्यातच! नाथाला आठवले – 'हरिनारायणाचा जन्म गोरक्षेतून होणार आहे' असे श्रीकृष्णाने पूर्वी सांगितले होते!

त्याने त्या ढिगाकडे पाहून हाक मारली – "अरे बाळा! ऊठ, बारा वर्षे झाली. मी कवी! मीच मच्छिंद्रनाथ, तुला न्यायला आलो आहे. तूच हरिनारायण आहेस. तू आता गोरक्षनाथ म्हणून प्रख्यात होशील."

गोबरातून आवाज आला, "गुरुमहाराज, मी इथे आहे, पण गोबरात अडकलो आहे." मच्छिंद्र त्या चकित झालेल्या स्त्रीला म्हणाला, "जा, लवकर फावडे आण." हा काय चमत्कार आहे हे पाहायला लोक जमले. 'मला बाहेर काढा!' असा आवाज त्या राखेच्या ढिगाऱ्यातून येत होता! फावडी आणून लोकांनी ढिगारा उपसला. तेव्हा खाली एक अकराबारा वर्षांचा तेजस्वी बालक सिद्धासन घालून बसलेला दिसला. त्याचे सौंदर्य पाहून लोक चकित झाले! त्या स्त्रीने कपाळावर हात मारून घेतला. ती रडू लागली. तिची समजूत घालून मच्छिंद्राने गोरक्ष असे त्या मुलाचे नाव ठेवून त्याला बरोबर घेतले. दोघे गाव सोडून निघून गेले! गावकरी प्रत्यक्ष चमत्कार पाहून थक्क झाले होते. ती स्त्री नशिबाला बोल लावीत रडत बसली!

८. मातीचा पुतळा जिवंत झाला!

मच्छिंद्रनाथाने गोरक्षाला सर्व विद्या शिकविल्या, सर्व सिद्धी दिल्या, सर्व शास्त्रे शिकविली, ब्रह्मज्ञानी सिद्ध केले. गोरक्षनाथाला –

होय, आता तो गोरक्षनाथ झाला होता – संजीवनी विद्याही शिकवली.

एका गावातली गोष्ट आहे. गोरक्ष संजीवनी मंत्राचा पाठ उजळणी म्हणून म्हणत होता. तेथे काही मुले खेळत होती. माती मळून त्या मातीची खेळणी बनविण्याचा त्यांचा प्रयत्न चालला होता. पण त्यांना ते जमत नव्हते. मातीची बैलगाडी, बैल, गाडीवान असे त्याना तयार करायचे होते. ती मुले गोरक्षाजवळ आली. तो त्यांच्यापेक्षा थोडासाच मोठा होता. मुलांनी मातीची गाडी कशीतरी बनविली होती. पण गाडीवान? गोरक्षाला त्यांनी गाडीवान बनवून द्यायला सांगितले. गोरक्षाला मुलांची दया आली. त्याने ओली माती घेतली. तिला तो माणसाचा आकार देऊ लागला. तोंडाने संजीवनी मंत्र म्हणणे चाललेच होते. पुतळा तयार व्हायला आणि मंत्रपाठ पूर्ण व्हायला एकच वेळ आली! आणि तो पुतळा एकदम सजीव झाला! तेथे आता एक मुलगा दिसू लागला. तो मुलगा बोलू लागला, चालू लागला. मुले घाबरली! 'भूत भूत' म्हणत पळत सुटली. त्यांना मच्छिंद्र वाटेतच भेटला. त्याने मुलांना धीर दिला व परत आणले. तिथे एकटा मुलगा रडत बसला होता! गोरक्ष सुद्धा भिऊन पळाला होता! मच्छिंद्राने मुलाला पाहताच ओळखले की हा करभाजन ऋषीच अवतार घेऊन आला आहे. त्याने त्या मुलाला जवळ घेतले, कुरवाळले व त्याला घेऊन तो गावात हिंडू लागला. लोक त्याला भिऊ लागले, कोणी विचारू लागले, "हा काय प्रकार आहे? तू कोणाचा मुलगा पळवून आणला आहेस?" मच्छिंद्र म्हणाला – "माझा गोरक्ष नावाचा एक शिष्य आहे तो सापडत नाही. तो सापडला की सारे सांगतो." गावात शोध घेतला तेव्हा गोरक्ष एका ठिकाणी लपलेला बाहेर आला. मच्छिंद्राला कळले की गोरक्ष मातीचा पुतळा करीत होता तेव्हा संजीवनी मंत्र म्हणत होता

त्यामुळे पुतळा जिवंत झाला. "त्यात करभाजन ऋषींनी प्रवेश केला आहे" असे सांगून त्याने गोरक्षाची भीती दूर केली.

गोरक्ष मच्छिंद्रनाथाची क्षमा मागू लागला, पण त्याचे काही चुकले नाही असे सांगून मच्छिंद्र त्या मुलाचे पालनपोषण करू लागला.

गावातल्या मधू नावाच्या ब्राह्मणाची पत्नी गंगाबाई हिने पुढे बाळाचे संगोपन करण्याचे पत्करले. त्या मुलाचे नाव 'गहिनी' असे ठेवून नाथाने त्या बाईला सांगितले "हा मुलगा मोठा योगी म्हणून पुढे प्रख्यात होईल. बारा वर्षांनी गोरक्ष येथे येईल त्यावेळी तू या मुलाला त्याच्या स्वाधीन कर." ती स्त्री म्हणाली –" हा माझा मुलगा म्हणूनच जगाने ओळखावे असा वर मला द्या." मच्छिंद्र म्हणाला – "बरे, तो तुझाच पुत्र आहे. आम्हाला पुत्राची आसक्ती नाही, पण जगाच्या कार्यासाठी त्याला पुढे योगदीक्षा देऊच."

मुलाची अशी व्यवस्था करून दोघे नाथ तीर्थयार्थेला गेले. पुढे मच्छिंद्राच्या सांगण्यावरून गोरक्ष बदरिकाश्रमात तप करण्यासाठी राहिला, कारण जरी त्याला सिद्धी मिळाल्या होत्या तरी मन चंचल होते, पूर्ण विवेक नव्हता. शंकराने स्वत: प्रसन्न होऊन गोरक्षाकडून बारा वर्षे तपश्चर्या करून घेतली. मच्छिंद्रनाथ गोरक्षाची तपाची व्यवस्था करून पुढे तीर्थयात्रेला निघाला, तो कोठे गेला?

९. स्त्रीराज्यात मच्छिंद्र!

मच्छिंद्र बारा वर्षे तीर्थयात्रा करीत फिरला व पुन्हा रामेश्वरास गेला. तेथे त्याने पूर्वी मारुतीला वचन दिले होते त्याप्रमाणे त्याला स्त्रीराज्यात जाणे भाग होते. मारुती आता त्याला भेटला. मारुतीने

त्याला वचनाची आठवण करून दिली. मच्छिंद्राने ते मान्य केले. मग ते स्त्रीराज्यात जाऊन राणी मैनाकिनीला भेटले. महायोगी मच्छिंद्राची मारुतीने तिच्याशी ओळख करून दिली व म्हटले, "तुझी संसाराची इच्छा माझ्याऐवजी हे नाथ पूर्ण करतील." मैनाकिनीलाही मच्छिंद्रनाथ आवडला होता. मग मारुती तेथून निघाला व पुन्हा रामेश्वर येथे रामचिंतनात काळ घालवू लागला. मच्छिंद्राने मैनाकिनीशी विवाह केला. कालांतराने त्या दांपत्याला पुत्र झाला. त्याचे नाव मीननाथ ठेवले. उपरिचर वसूच्या तेजापासून मीननाथाचा अवतार झाला होता. मीननाथ सर्वांचा अत्यंत लाडका झाला. मच्छिंद्र मैनाकिनीसह अनेक सुखे भोगीत स्त्रीराज्यात राहिला. हनुमंताला वचन दिले होते म्हणूनच त्याने हा संसार केला!

१०. यज्ञकुंडातून बालक जन्मला!

हस्तिनापुरात बृहद्रवा नावाचा राजा राज्य करीत होता. जनमेजयानंतरचा हा सातवा पुरुष. त्या राजाने देशोदेशीचे राजे बोलावून सोमयाग आरंभिला. यज्ञात मंत्रांनी आहुती दिल्या जाऊ लागल्या. अग्नी प्रदीप्त होता. पूर्वी शंकराने मदनाचे दहन केले होते त्यावेळी मदनाचे शरीर भस्म झाले पण त्याचे मन वासनारूपाने अग्नीत प्रविष्ट झाले हाते. बृहद्रवा राजाच्या सोमयागात कुंडातील अग्नीत ती वासना प्रकट झाली ती एका बालकाच्या रूपात. यज्ञाग्नी शांत झाल्यावर ब्राह्मण रक्षा काढीत असता तो दिव्य बालक त्यांना गवसला! सर्वत्र तेज फाकले! कारण तो अग्नीचाच पुत्र होता! राजाला तर फारच आनंद झाला. अग्नीने दिलेला हा पुत्र त्याने आपल्या पत्नीजवळ दिला व 'मीनकेत' नावाच्या राजपुत्राचा धाकटा

भाऊ म्हणून तो राजप्रासादात वाढू लागला. अग्नीत, ज्वालांत जन्मला म्हणून त्याचे नाव 'जालंदर' (ज्वालाधर) ठेवण्यात आले.

जालंदर मोठा होऊ लागला. त्याच्या विवाहाच्या गोष्टी बोलल्या जाऊ लागल्या. त्याला कळेना की विवाह कशासाठी व तो कुणाशी करतात. त्याने आपल्या आईला विचारले – "आई माझा विवाह करणार म्हणजे काय?" ती म्हणाली, "म्हणजे तुला पत्नी आणणार." "म्हणजे काय?" "अरे पत्नी म्हणजे बायको आणणार." जालंदर म्हणाला "ती कशाला? ती कशी असते?" राणी म्हणाली "बायको म्हणजे माझ्यासारखी असते." तो म्हणाला, " तू आहेस ना! मग आणखी कशाला?" "अरे तुझे पिता व मी पतिपत्नी म्हणून संसार करतो. तसा तू करणार." असे म्हणून तिने जालंदराला संसार म्हणजे काय ते समजावून सांगितले. पण त्याला कळले नाही. मग त्याने समवयस्क मित्र, मंत्र्यांचे मुलगे, नोकर, इत्यादींजवळ विचारले तेव्हा प्रथम त्यांनी अज्ञानाबद्दल त्याची टवाळी केली पण मग सर्व काही सांगितले. तेव्हा जालंदर पार बिथरून गेला. 'आईसारखीच आपली बायको आणि असा प्रकार!' असे वाटून तो घाबरला आणि एक दोन दिवसांत राजवाड्यातून व राजधानीतून गुपचूप निघून गेला! जालंदर बेपत्ता झाला तेव्हा राजाराणीने खूप शोक केला. पण वृद्ध मंत्र्यांनी राजाचे सांत्वन केले. "तो मुलगा दिव्य अग्नीतून प्रकट झालेला! तुमचे संतान नव्हे. तो केव्हातरी निघून जाणारच हाता. तो तुम्हाला केव्हातरी भेटेल, शोक करू नका" असे ते म्हणाले.

जालंदर पुढे घोर अरण्यात शिरला. त्याला थकून झोप लागली. एका झाडाखाली तो निजला, तेव्हा अरण्यात वणवा पेटला. सर्वत्र आगीचे लोळ उठू लागले. जालंदराजवळ ज्वाला आल्या पण जालंदर हा आपलाच पुत्र आहे हे अग्नीने ओळखले. त्याने त्याला जाळले नाही. मानवरूपाने त्याला जागे केले. जालंदराने विचारले,

"तुम्ही कोण?" तेव्हा अग्नी म्हणाला – "मुला! मी अग्नी आहे. तू माझाच पुत्र आहे.!" जालंदर म्हणाला – "असे कसे होईल? बृहद्रवा राजा माझा पिता आहे."

तेव्हा अग्नीने त्याला मदनदहनाचा इतिहास सांगितला, अग्निकुंडातून जालंदर कसा जन्मला ते सांगितले. जालंदराच्या रूपाने 'अंतरिक्ष' नावाच्या ऋषीने आपले तेज प्रकट केले आहे हे अग्नीला माहीत होते. त्याने जालंदराला अवताराचे रहस्य सांगितले.

हे कळताच जालंदराने जीवन सार्थक व्हावे असा उपदेश मागितला, तेव्हा अग्नीने त्याला घेऊन दत्तात्रेयांकडे गमन केले. दत्तात्रेयांनी सर्व समजून घेऊन जालंदराला शिष्य म्हणून जवळ बाळगले. जेथे जेथे दत्त जात तेथे जालंदर त्यांच्याबरोबर! बारा वर्षेपर्यंत त्यांनी जालंदराला सर्व विद्या व सिद्धी दिल्या. दीक्षा सफल झाली. पुन्हा त्याला अग्नीजवळ पाठविले. अग्नीने बदरिकाश्रमात त्याला तपश्चर्या करण्यासाठी ठेवले. बदरीनाथ साक्षात् प्रकट झाला. त्याने अनेक वरदाने दिली. जालंदराला व दत्ताला त्याने एक कथा सांगितली.

११. हत्तीच्या कानातून बालकाचा जन्म

बदरीनाथ म्हणाला – "पूर्वी ब्रह्मदेवाचे त्याची कन्या सरस्वती हिच्यावरच मन गेले. त्याचा परिणाम असा झाला की ब्रह्मदेवाचे तेज निर्माण झाले ते हिमालयात पडले. एका हत्तीच्या कानात ते पडले – त्यात 'प्रबुद्ध' नारायण ऋषींनी अंशावताराने देह धारण केला! तो बालक तेव्हापासून हत्तीच्या कानात तसाच आहे. जालंदरा! तू त्याला बाहेर काढ. तो हत्ती निजलेला आहे."

जालंदर व अग्नि यांना तो हत्ती कोठे आहे ते माहीत नव्हते, तेव्हा बदरीनाथ त्यांना घेऊन हिमालयात गेला. त्यांना हत्ती जागा असून इतस्तत: फिरत आहे असे दिसले. जालंदराने मोहनास्त्र व स्पर्शास्त्र यांचा प्रयोग करून हत्तीला शांत केले व जागच्या जागी स्थिर ठेवले. मग ते तिघे हत्तीजवळ सौम्य रूपात गेले व जालंदराने हत्तीच्या कानात हाक मारली,"अरे प्रबुद्ध नारायणा! बाहेर ये. मी अंतरिक्ष ऋषी तुला बोलावीत आहे. हे अग्निनारायण व बदरीनाथ स्वतः तुला बोलावीत आहेत."

ते ऐकून हत्तीच्या कानातून सोळा वर्षांच्या एका तरुणाने बाहेर डोकावून पाहिले. ओळख पटली. जालंदराने त्याला उतरविले. तरुणाने तिघांना वंदन केले. तिघांनी त्याला आशीर्वाद दिले. बदरीनाथाने म्हटले "जालंदरा, याचे नाव कानीफ असे ठेवा. याला विद्यादान तू द्यायचे आहे."

नंतर जालंदराने योग्य समयी कानीफाला गुरुमंत्र दिला. तेथून सर्वजण बदरिकाश्रमी आले. जालंदराने कानीफास दत्तांकडून मिळालेली सर्व सिद्धविद्या दिली. स्वतः बदरीनाथ उपस्थित राहिले. कानीफाला वाताकर्षण मंत्र व संजीवनी मंत्र हे मात्र शिकविले नाहीत कारण कानीफ त्यांचा उपयोग नीट करीलच असा विश्वास नव्हता. जालंदराने सप्तलोक व सप्तपाताळे यातील देवताना आवाहन केले व कानीफाच्या मंत्रांत आपापली शक्ती संचारित करण्याची विनंती केली. पण देवतांनी कानीफाचा धिक्कार केला आणि त्या तशाच निघून जाऊ लागल्या! तेव्हा कानीफाला अपमान सहन झाला नाही. त्याने अस्त्र प्रेरून देवांची विमाने आकाशातच स्तब्ध केली. इंद्रादिकांनी त्याच्यावर अस्त्रांचा उलट मारा केला पण व्यर्थ! हरी व हर हे दुरून पाहात होते! सर्व देव अग्नी व जालंदर यांवर हल्ला करून आले. तेव्हा जालंदराने देवांवर स्त्रीअस्त्र व कामास्त्र यांचा प्रयोग केला. त्या स्त्रियांना भुलून देव बोरीच्या काटेरी झाडांत अडकले व

कानीफाने स्पर्शास्त्र फेकताच ते त्या झाडांना उलटे टांगून लोंबकळू लागले! त्या मायानिर्मित स्त्रियांनी देवांची वस्त्रे ओढून घेतली तेव्हा देवांच्या फजितीला पारावार राहिला नाही! जालंदराजवळ स्त्रियांनी सारी वस्त्रे आणून ठेवली!

जालंदराने कानीफाला सांगितले – " देव शरण आले आहेत. त्यांना वृक्षांवरून सोडव आणि वस्त्रे परत दे." तेव्हा कानीफाने सर्व मायाशक्ती आवरली. वस्त्रे नेसून देव कानीफाला हात जोडून म्हणाले, " आम्ही तुझे सर्व मंत्र सफल करू." कानीफाने सामर्थ्याने देवांना नमविले होते! आता तो सिद्ध झाला होता.

१२. गवताचा भारा अधांतरी!

कानीफनाथ व जालंदरनाथ यांना हरिहरांनी कलियुगातील धर्म व मोक्ष मार्गाचे कार्य इतर नाथांबरोबरीने कसे करावे ते समजावून सांगितले. मग प्रजांच्या उद्धारासाठी शाबरी विद्या आणि असंख्य सिद्ध मंत्रयुक्त मोठमोठी काव्यरचना त्यांनी केली. पुढे ते तप करायला गेले. कानीफनाथ बदरिकाश्रमात राहिला. मग जालंदर तीर्थयात्रेस निघाला.

गौड देशात हेलापट्टण नगर होते. जालंदर नेहमी रानातून गवत कापून त्याचा भारा नगरात आणून विकी व त्यातून मिळणाऱ्या द्रव्यावर जीविका चालवी. स्वतःच्या डोक्यावर गवताचा भारा तो दोन हात अंतरावर योगशक्तीने तरंगत ठेवीत असे. डोक्याला श्रम नकोत! पण त्याच्या या चमत्कारामुळे तो प्रख्यात झाला. त्याला पोटापुरती प्राप्ती होतच होती. लोक त्याच्यामागे लागले! त्यांचा उपद्रव टळावा म्हणून तो दूर कुठेतरी घाणेरड्या ठिकाणी राहायचा!

हेलापट्टणचा राजा होता गोपीचंद. त्याची आई मैनावती धार्मिक व साध्वी स्त्री होती. गोपीचंद मातृभक्त होता पण राजविलासात मग्न असे. हजारो स्त्रियांच्या सहवासात तो रमे. जालंदर एकदा मार्गाने चालला होता. त्याच्या डोक्यावर अधांतरी गवताचा भारा होता. राजवाड्यासमोरून तो चालला असता मैनावतीने त्याला पाहिले. त्याचे साध्या साधुवेषातील अलौकिक तेज पाहून मैनावतीने त्यालाच गुरू मानावयाचे ठरविले. तिने दासीला सांगून जालंदरामागे तिला पाठविले व तो कोठे मुक्कामास असतो याची माहिती मिळविली. तो केरकचरा टाकण्याच्या ओसाड जागी जाऊन बसतो हे दासीने पाहिले व मैनावतीला सांगितले.

रात्री दोघीजणी गुप्त वेषाने त्याला भेटायला गेल्या. पंचपक्वान्नांचे ताट त्याच्यापुढे ठेवले. पण त्याने ते तर घेतलेच नाही. उलट तो त्यांना दगड मारून हाकलून देऊ लागला. तरी मैनावती तशीच उभी राहिली. तेव्हा त्याने म्हटले – "तुम्ही माझ्या मागे का लागता ? कोण तुम्ही ?" तेव्हा मैनावतीने आपली ओळख करून दिली. जालंदर म्हणाला – "तुम्ही अपरात्री इथे आलात, तुमची बदनामी किती होईल याचा विचार करा ! परत जा !" मैनावती म्हणाली – "मला जीवनात रस वाटत नाही. मला मोक्षमार्गाचा उपदेश करावा." जालंदराजवळ तिने दीक्षा मागितली व "माझ्या या अशा म्हातारपणी संसारातून पार होण्याचा मार्ग दाखवा" असे विनविले. दोघी परत गेल्या पण रोज रात्री दासीसह मैनावती नाथाकडे जाऊन त्याची सेवा करीत राहिली. त्याचे पाय चेपावे, त्याची तपश्चर्येची जागा स्वच्छ करावी, त्याला चांगले अन्न खाऊ घालावे. आई मुलासाठी जे जे करील ते ते ती भक्तीने करू लागली. जालंदराने मायेने एक भुंगा निर्माण केला, तो तिच्या मांडीला चावला. मांडीवर डोके टेकून जालंदर निजून राहिला. मैनावतीने दंश सहन केला ! मग जालंदराने तिला म्हटले – "तुम्ही धैर्यवती आहात. दीक्षा देण्यास योग्य

आहात.'' भुंग्याने केलेली जखम त्याने योगशक्तीने नाहीशी केली. मैनावतीला जालंदराने मोक्षाचा उपदेश दिला. मंत्र दिला, संजीवनी विद्या दिली, ब्रह्मस्थिती प्राप्त करून दिली. मैनावती त्याची शिष्य झाली. आपला मुलगा गोपीचंद भोगविलासात मग्न आहे, त्यालाही जालंदराने गुरूपदेश दिला तर किती बरे होईल असा विचार मैनावतीच्या मनात आला. ही तळमळच तिला लागून राहिली होती.

१३. आई, तू का रडतेस?

एकदा राजवाड्याच्या चौकात गोपीचंद स्नानाला बसला होता. अनेक स्त्रिया त्याच्या अंगाला उटणे लावणे, सुगंधित पाणी ओतून तयार ठेवणे, असे उपचार करीत होत्या. राजा त्यात अगदी मग्न होता. वर सज्जात वृद्ध मैनावती बसली होती. ती हे सारे पाहात होती. तिला वाईट वाटले. गोपीचंदाचा उद्धार कसा होईल या विचाराने तिचे मन द्रवले. डोळ्यात अश्रू आले. नवल असे की नेमके ते अश्रू खाली गोपीचंदाच्या अंगावर पडले! तो चमकून वर पाहू लागला. आई रडत आहे हे पाहून तो माडीवर तसाच गेला. ''आई! तुला कसले दुःख झाले आहे? तुला सर्व सुखे आहेत ना? तू का रडतेस? मला सांग. मी तुझे दुःख दूर करीन!'' त्याने मातृप्रेमाने विचारले!

मैनावती म्हणाली, ''मला भौतिक दुःख काही नाही पण तुझा पिता गेल्यानंतर मला कशातच रस वाटत नाही. तू सुंदर आहेस, पण तूही पित्याप्रमाणेच हा सुंदर देह टाकून जाणार! या नश्वर देहाचे तू किती चोचले पुरवितोस! तारुण्य गेले की तुझी काय स्थिती होईल! चितेत हाच देह जळून जाणार आहे! तुझा उद्धार कसा होणार

याच्या चिंतेने मी रडत होते. तू भगवंताची भक्ती कर. जन्माचे सार्थक कर." मैनावतीने वैराग्यपर अनेक गोष्टी सांगितल्या. गोपीचंद म्हणाला – "मला मार्ग दाखवील असा कोणी महात्मा आहे का? मी दीक्षा घेईन! तू म्हणतेस ते खरे आहे!" आई म्हणाली, "आहेत असे एक ब्रह्मनिष्ठ योगी, पण तू दीक्षा केव्हा घेशील?"

"आई, हे सर्व सुख सोडावे असे मला वाटत नाही. मी बारा वर्षांनंतर दीक्षा घेईन." गोपीचंद म्हणाला. पण मैनावती त्याला लवकर निवृत्तिमार्गाला लागण्याचा आग्रह करीत होती. तिने जालंदरनाथाचे नावही सांगितले.

पट्टराणी लुमावंती हिला सासूचे बोलणे ऐकायला आले होते. तिला तिचा राग आला. गोपीचंद विरक्त झाला तर संसाराचे वाटोळे होणार याची तिला धास्ती वाटली. तिने गुप्तपणे सखींजवळ एक कारस्थान रचले.

रात्री राजा लुमावंतीच्या महालात आला. प्रेमात येऊन लुमावंतीने जालंदराविषयी राजाच्या मनात किल्मिष निर्माण केले. "मैनावतीआईचा बेत असा आहे की जालंदराकडून तुम्हाला संन्यासदीक्षा द्यावी व तीर्थयात्रेला पाठवून द्यावे. तुम्ही गेलात की ती जालंदराला राज्यावर बसविणार आणि त्याच्यासह सुखोपभोग भोगणार! अहो! आपण तिचे कारस्थान सफल होऊ देऊ नका."

गोपीचंद संतापला. पत्नीचे बोलणे त्याला खरे वाटले. त्याने रातोरात काही सेवकांना बोलावून जालंदराचा शोध घेतला. तेव्हा जालंदर समाधीत होता. राजाने जवळच्याच एका कोरड्या विहिरीत त्याला उचलून टाकले व विहिरीत केर, शेण, लीद आदि टाकून विहीर बुजवून टाकली. सर्व सेवकांना गुप्ततेची शपथ घ्यायला सांगितले. रातोरात सर्व परत आले. राजाचे हे कृत्य कोणासही कळले नाही. मैनावतीला, सर्व प्रजाजनांना असे वाटले की जोगी नगर सोडून बाहेर गेला असावा. मैनावतीला वाईट वाटले.

गोपीचंदाच्या स्त्रियांना हायसे वाटले. प्रजाजन दोन दिवस आपापसात चर्चा करून पुन्हा आपापल्या नित्यकर्माला लागले.

जालंदराला समाधीतही राजाचे कृत्य कळले होते पण त्याने राजाविरुद्ध काहीच केले नाही. वज्रास्त्राचा त्याने स्वतःवरच प्रयोग केला. त्यावर केरकचरा पडू लागला तेव्हा आकाशास्त्राने त्याने भोवती पोकळी निर्माण केली व त्यात तो पुन्हा ध्यान करू लागला.

तिकडे कानीफ व गोरक्ष तपश्चर्या झाल्यावर वेगवेगळे तीर्थयात्रेला निघाले. कानीफ उत्तरेकडे व गोरक्ष दक्षिणेस गेला. गोरक्ष मच्छिंद्राचा शोध घेत होता. तो हेलापट्टण नगरात आला. तेथील लोकांकडून त्याला कळले की तेथे काही वर्षांपूर्वी एक सिद्ध योगी उकिरड्यावर राहात असे. गवताचे भारे गावात विकून भिक्षेवर पोट भरीत असे. एक दिवस अचानक तो कोठेतरी निघून गेला असावा. तोच मच्छिंद्र असावा असे वाटून गोरक्ष शोक करू लागला. लोकांनी त्याची समजूत काढली. पुढे गोरक्ष एका ठिकाणी भिक्षा मागत होता. आजूबाजूस ओसाड जागा होती. जवळच एक घर होते. "जय अलख निरंजन!" असे मोठ्याने म्हणत तो तिकडे चालला. तेव्हा भूमीखालून प्रतिसाद आला – "जय अलख निरंजन!" गोरक्षाने विचारले – "कोण आहे? कुठे आहे?" बंद कूपातून आवाज आला – "मी जालंदर आहे. दत्तांचा शिष्य! अग्निपुत्र! गोपीचंद राजाने पत्नीच्या मताने मला या जागी पुरले आहे! आपण कोण?"

गोरक्षाने आपले नाव सांगितले. मच्छिंद्रांचा शोध घेत फिरत आहे असे सांगितले. जालंदरनाथाची अशी अवहेलना करणाऱ्या गोपीचंदाला चांगली शिक्षा करतो गोरक्ष असे म्हणू लागला. पण जालंदर म्हणाला – "थांबा! अजून त्याला वेळ आहे. गोपीचंदाला पश्चात्ताप होऊन तो मुमुक्षू होईल याची योजना पुढे आहे. तुम्ही

काहीच करू नका! तुम्हाला कानीफनाथ भेटेल. त्याला हे सगळे सांगा. तोच युक्ती करून राजाचे व पंथाचे कल्याण करील."

गोरक्षाने ते मान्य केले व तो पुढे तीर्थयात्रेला निघून गेला.

१४. कानीफनाथाचा पराक्रम

कानीफनाथ तीर्थाटण करीत असता त्याचे शिष्य वाढले. सातशे शिष्य मिळाले. तो पुढे पूर्वेकडे गेला. मार्गात त्याला कळले की 'पुढे स्त्रीराज्य आहे व त्यात जो पुरुष प्रवेश करील तो मरेल' तरीही तो जायला निघाला पण त्याचे शिष्य भयाने पुढे जाईनात. ते परत फिरू लागले. तो म्हणाला, "मजवर विश्वास ठेवा, आपण मरणार नाही." तरी ते ऐकेनात. काही मात्र यायला निघाले. कानीफाने स्त्रीराज्याकडील मार्ग वगळता इतर मार्गावर स्पर्शास्त्र भस्माने मंत्रून घालून ठेवले व म्हटले, "ज्यांना यायचे असेल त्यांनी चला. नाहीतर जिकडे वाटेल तिकडे जा."

तो पुढे गेला. फक्त सात शिष्य त्याच्याबरोबर राहिले. बाकीचे गटागटाने परत फिरले. ते जरासे अंतर मागे गेले तोच जमिनीवर चिकटून बसले. पाय, हात, सर्वच चिकटले. ते ओणवेच राहिले. कानीफाने सात शिष्याना सांगितले, "तुम्ही मोठमोठे दगड घ्या आणि त्या मागे फिरलेल्या शिष्यांच्या पाठीवर ठेवून या. तुम्ही चिकटणार नाही, मी विभक्तास्त्राचे भस्म तुमच्यावर टाकतो." कानीफाची आज्ञा त्या शिष्यांनी पाळली. बाकीचे शिष्य पाठीवर ओझे आल्यावर गुरुजी, सोडवा, सोडवा, असे ओरडू लागले पण तिकडे दुर्लक्ष करून कानीफ व सात शिष्य पुढे निघाले. परंतु सात शिष्यांच्या मनात दया आली. त्यांनी कानीफाला विनंती केली की "त्यांना मुक्त

करा." तेव्हा कानीफाने त्यांना मुक्त केले. सर्वजण कानीफाबरोबर स्त्रीराज्यात जायला निघाले. आता त्यांची गुरूवर श्रद्धा बसली.

स्त्रीराज्याच्या सीमेवर मारुती आला. तोही स्पर्शास्त्राने जमिनीवर चिकटला पण त्याने आपली सुटका करून घेतली. सीमेजवळ कानीफनाथ व सातशे शिष्य त्याला दिसले. हा नाथपंथी साधू मच्छिंद्राला परत नेईल, तर त्याला इथेच अडवावा म्हणून मारुतीने विशाल रूप धारण केले. पण कानीफाने कालिका, अग्नि, वायू व इंद्र यांची अस्त्रे मारुतीवर फेकली. मारुतीला त्यांचा त्रास होऊ लागला. वायूने मारुतीला सांगितले की 'पूर्वी मच्छिंद्राने तुझा जसा पराभव केला होता तसाच हा नाथही पराक्रमी आहे. तू याला अडवू शकणार नाहीस. याच्याशी सख्य कर." तेव्हा मारुतीने त्या सर्वांना त्या स्त्रीराज्यात जाऊ दिले पण 'मच्छिंद्राजवळ योग व निवृत्ती यांविषयी काही बोलायचे नाही' अशी अट कबूल करून घेतली.

स्त्रीराज्यात मच्छिंद्राने कानीफाचे स्वागत केले. त्याचा पराक्रम त्याला कळला होता. "गोरक्षनाथाला जर कानीफाकडून आपला ठावठिकाणा कळला तर गोरक्षनाथ येईल व मला परत नेईल, त्यापेक्षा कानीफाला व त्याच्या शिष्यांना येथेच गुंतवावे' असा विचार करून मच्छिंद्राने सर्वांना जास्तीत जास्त वैभवात ठेवले. त्यांना मोहित करण्यासाठी स्त्रियांची योजना केली, परंतु कोणीही वश झाले नाहीत. सहा महिन्यांनी सर्वजण जायला निघाले तेव्हा भरपूर सामग्रीसह मच्छिंद्राने त्यांना निरोप दिला!

देशोदेशी हिंडत कानीफनाथ तीर्थयात्रा करीत व सिद्धींचे चमत्कार दाखवीत पुढे वंग देशातही गेला. गोपीचंद राजाच्या कानी कानीफाची कीर्ती गेली व कानीफाला बोलावून त्याला सन्मानाने वागवावे असा बेत तो करू लागला.

वंग देशात गोरक्षनाथही आला होता. त्याची व कानीफाची तेथे भेट झाली. गोरक्ष हा मच्छिंद्रनाथाचा शिष्य व कानीफ हा

जालंदरनाथाचा शिष्य. दोघांना परस्परांचे गुरू कळले. मच्छिंद्राचा शोध गोरक्ष करीत होता. कानीफ व गोरक्ष यांची स्पर्धा जुंपली. गोरक्षाच्या आव्हानावरून कानीफाने रानातील आंब्यांच्या वृक्षांवरील आंबे, बसल्या जागेवरूनच मंत्रांच्या प्रभावाने खाली आणले. पुष्कळ आंबे शिष्यांनी खाऊन संपविले. उरलेले आंबे पुन्हा योगसामर्थ्याने वृक्षावर चिकटवून दाखव असे आव्हान गोरक्षाने केले पण कानीफाला ते जमेना. मग गोरक्षाने तसे करून दाखविले. त्यावेळी दोघांनी परस्परांच्या गुरूची स्थिती सांगितली. जालंदराला गोपीचंदाने विहिरीत पुरून ठेवले आहे हे कानीफाला कळले तर मच्छिंद्र स्त्रीराज्यात मैनाकिनीबरोबर संसार करीत आहे हे गोरक्षाला कळले.

गोरक्ष स्त्रीराज्यात जायला निघाला व कानीफ हेलापट्टण नगराकडे निघाला!

१५. पाच पुतळे भस्म झाले!

कानीफनाथाचे गोपीचंदाने मोठ्या थाटात स्वागत केले. त्याच्या शिष्यांची उत्तम सोय केली. राजाने नाथाला शरण जाऊन त्याच्याजवळ अनुग्रह मागितला. कारण जालंदर घाणेरडा होता व कानीफ मोठा वैभवशाली होता! कानीफाजवळ राजाचे वागणे वेगळे व जालंदराला मात्र त्याने लिदीत पुरून ठेवले होते. कानीफ म्हणाला, "राजा! तुला खराच अनुग्रह हवा आहे तर ज्यांच्याजवळ तू अनुग्रह घ्यावास त्यांना जमिनीत गाडून टाकले आहेस! माझ्यापुढे लोटांगण कशाला घालतोस?" गोपीचंद फार घाबरला! आता हा नाथ आपले भस्म करणार असे भय वाटून तो गयावया करू लागला. कानीफाने राजाला आपल्या शिबिरात नेले. त्याला अभय

दिले. गोपीचंदाच्या आईला, मैनावतीला राजाचे दुष्कृत्य आला दासींकडून कळले. ती राजाला फारच दूषणे देऊ लागली, रडू लागली. पण राजाने तिची वारंवार क्षमा मागितली. कानीफाचा राग शांत करण्याची विनंतीही तिला राजाने केली! मैनावती कानीफाकडे गेली व म्हणाली, "मी जालंदराची शिष्या आहे! जालंदराला राजाने पुरले हे मला माहीत नव्हते. ही भयंकर गोष्ट आत्ताच मला कळली, तेव्हा मी लगेच तुमच्याकडे धावत आले आहे. गोपीचंदाला तुम्ही क्षमा करावी. तुम्ही माझे गुरुबंधू आहात. मला पुत्रहीन करू नका." कानीफाचे मन द्रवले. जालंदर जिवंत आहे हे त्याला माहीत होते. त्याला वाटले की जालंदराचा क्रोध एवढा भयंकर आहे की तो गोपीचंदाला जाळून टाकील तर त्यासाठी एक युक्ती करावी.

कानीफाने गोपीचंदाकडून जालंदराला जेथे पुरले ती जागा माहीत करून घेतली. मग त्याने राजाला सांगितले, "तुझ्यासारखे हुबेहूब असे पाच पुतळे तयार करून घे." राजाने थोड्याच दिवसांत तसे पुतळे करून घेतले. सोने, चांदी, पितळ, तांबे व लोखंड यांचे ते पुतळे होते. त्यातला सोन्याचा पुतळा विहिरीच्या वर ठेवला. मग राजाला सांगितले, "आता तू स्वत: कुदळीने या जमिनीवर खणण्यासाठी घाव घाल. आतून नाथ विचारतील, "कोण खणतोय?" तर तू स्वत:चे नाव सांग, पण विहिरीवरून दूर उभा रहा."

राजाने कुदळीचा घाव घातला. आणि तो चटकन बाजूला झाला. आतून आवाज आला, "कोण खणतोय?" राजा म्हणाला, "मी गोपीचंद खणतोय." तत्काळ विहिरीतून क्रोधाग्नीची ज्वाळा वर आली व सोन्याचा पुतळा वितळून गेला. कानीफाने अशाच प्रकारे उरलेले चारी पुतळे जालंदराच्या रागाला बळी दिले. गोपीचंदाने प्रत्येक वेळी "मी गोपीचंद" असे म्हटले, तेव्हा जालंदराला वाटले की पाच वेळा मी अग्नीने भस्म करण्याचा प्रयत्न केला तरीही

गोपीचंद जिवंत आहे! आता जर तो माझ्या दृष्टीस पडला तर चिरंजीव होईल.

कानीफाने राजाला पुन्हा खणायला सांगितले व आतून प्रश्न येताच म्हटले, "गुरुवर्य, मी कानीफ, तुमचा शिष्य आलो आहे. गोपीचंद खणीत आहे. तुम्हाला भेटण्यासाठी मी व्याकुळ झालो आहे."

जालंदराचा राग मावळला. "गोपीचंद चिरंजीव होवो." असा त्याने आशीर्वाद दिला.

जालंदराने वज्रास्त्र आवरून घेतले व स्वत:च सर्व माती योगशक्तीने भेदून तो बाहेर निघाला. गोपीचंदाने त्याचे पाय धरले. मैनावतीही शरण आली. गोपीचंदाला आता योगसामर्थ्यापुढे राजवैभव तुच्छ वाटू लागले! तो विरक्त झाला. त्याने नाथपंथाची दीक्षा व उपेदश जालंदरनाथाकडून ग्रहण केला. नाथपंथाची लक्षणे धारण केली. झोळी घेतली. त्याच्या अंत:पुरात शोकसागर उचंबळला! पण गोपीचंदाला जालंदराने पहिल्या प्रथम राजवाड्यातच भिक्षा मागायला सांगितले! स्त्रियांनी राजाला गुंतवून ठेवण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, पण गोपीचंदाचे मन वळले नाही. मैनावतीने राजाला, आपल्या मुलाला भिक्षा घातली! राजा पूर्ण विरक्त झाला आहे असे पाहून जालंदराने त्याला नगर सोडून बदरिका आश्रमात तप करण्यासाठी पाठविले.

मंत्र्यांनी राजपुत्र मुक्तचंद याला राज्याभिषेक केला. गोपीचंदाच्या स्त्रियांचा मान राख असे जालंदराने मुक्तचंदाला सांगितले. सहा महिने जालंदर व कानीफ हेलापट्टण येथे राहिले व त्यांनी राज्याची नीट व्यवस्था लावून दिली.

१६. गोपीचंदावर संकट आले!

गोपीचंद यात्रा करीत बदरिकाश्रमाकडे निघाला. मार्गात तो नगर किंवा गाव लागले की भिक्षा मागे, जी मिळेल ती घेई व एकदोन दिवस राहून पुढे जाई. जाता जाता कौल देशात तो पौलपट्टण नगरात गेला. तेथे तिलकचंद नांवाचा राजा होता. त्याच्या पुत्राला गोपीचंदाची बहीण चंपावती दिलेली होती. गोपीचंद बैरागी झाला हे तिथे कळले होते, त्याची तिथे निंदाच झाली. गोपीचंद त्या नगरात एका पाणवठ्याजवळ बसला होता. चंपावतीच्या दासी तेथून जात होत्या. त्यांनी त्याला ओळखले व राजवाड्यात जाऊन सांगितले. तिलकचंदाला वाटले, गोपीचंद नगरात भिक्षा मागत हिंडला तर लोक आपल्याला हसतील. त्याने सेवकांना सांगितले, "गोपीचंद भिक्षा मागायला निघण्याआधी त्याला बहिणीने बोलावले आहे असे सांगून राजवाड्यात घेऊन या." सेवकांनी गोपीचंदाला भेटून तसे सांगितले. पण प्रथम त्याने नकार दिला. सेवक म्हणाले, "बहिणीचे मन मोडू नका." तेव्हा जरी आपण बैरागी असलो तरी चंपावतीला भेटून जावे असा विचार करून राजा राजवाड्याकडे गेला. पण तिलकचंदाने गोपीचंदाची व चंपावतीची भेट न होऊ देता, त्याला अश्वशाळेत बसविले व तिथेच पक्वान्नांचे ताट वाढून जेवायला दिले. प्रथम गोपीचंदाला हा अपमान वाटला. पण नंतर विरक्ताला मानअपमान नसतात हे आठवून तो गप्प राहिला.

दासींनी चंपावतीला एका गवाक्षातून गोपीचंद दाखविला. तिला फार वाईट वाटले. त्यातून "तुमचा भाऊ असा कसा भिकारी? पागेत तुकडे मोडीत काय बसला आहे?" इत्यादी प्रकारे बोलून सर्वजणींनी तिची थट्टा केली. चंपावतीला फार वाईट वाटू लागले.

तिला जीव नकोसा झाला. तिने एकांत गाठून पोटात खंजीर खुपसून आत्महत्या केली.

गोपीचंदाने एकदा तरी चंपावतीला मला भेटू द्या असे वारंवार म्हटले, तेव्हा इथेच वस्तीस राहा, आम्ही चंपावतीला निरोप सांगतो असे म्हणून रात्री दासी चंपावतीला भेटायला गेल्या. तो ती तेथे मरून पडलेली त्यांना दिसली. त्या घाबरल्या. सर्वत्र वार्ता पसरली की हा आला नि चंपावती मेली याचाच बोभाटा करून राजवाड्यातील सर्व लोक गोपीचंदाला दूषणे देऊ लागले. आधी अपमान करून आता बहिणीच्या मृत्यूचे खापर त्याच्या माथी ते लोक मारणार होते. गोपीचंदाला फारच दु:ख झाले. पण त्यातही आपल्या गुरुपरंपरेला लोक दोष देतील तो कलंक लागू नये याची त्याला काळजी वाटत होती.

लोकांनी चंपावतीचा मृत देह स्मशानात नेला. सर्वजण शोक करीत होते. चंपावतीला आपण जर पुन्हा जिवंत केले तर लोकांची तोंडे गप्प होतील असा विचार करून गोपीचंदही स्मशानात गेला व प्रेताच्या साक्षीने तो लोकांना म्हणाला, "लोक हो! चंपावतीचा देह जाळू नका. मी माझे गुरू जालंदरनाथ यांना बोलावतो. ते सिद्धयोगी आहेत. ते चंपावतीला पुन्हा जिवंत करतील."

पण लोक त्याचे ऐकेनात. त्यांनी चिता रचली. तेव्हा तोही चितेवर जाऊन बसला व "मलाही जाळून टाका!" असे ओरडू लागला. तो दु:खाने वेडा झाला असे वाटून लोक विचारात पडले. एकदोघांनी युक्ती लढविली.

"ए बैराग्या, चंपावतीचा एक हात तोडून तुला देतो. तो घेऊन तू गुरूकडे जा नि चंपावतीला कर जिवंत!"

असे म्हणून त्यांनी खरोखरच त्याला चितेवरून खाली ओढले व तिच्या प्रेताचा एक हात तोडून त्याला दिला. तो येईपर्यंत प्रेत न जाळण्याचे तिलकचंदाने ठरविले.

गोपीचंद हेलापट्टणाकडे निघाला. जालंदराला अंतर्ज्ञानाने हे कळले होते तो गोपीचंदाला वाटेतच भेटला व त्याला घेऊन पौलपट्टण येथे परत आला. जालंदराने चंपावतीच्या हातावरच संजीवन मंत्राने भस्म टाकले तेव्हा सर्वांच्या देखत चंपावती जशी होती तशी पुन्हा जिवंत झाली.

सर्वत्र जालंदर व गोपीचंद यांचा जयजयकार झाला. ते दोघे तिलकचंदाच्या आग्रहावरून चंपावतीच्या हाताने केलेले भोजन स्वीकारून व तिला जालंदराने आशीर्वाद दिल्यावर तेथून निघाले. गोपीचंदाचा पुत्र मुक्तचंद लहान आहे तेव्हा त्याचे राज्य तुम्ही सांभाळा असे जालंदराने तिलकचंदास सांगितले, ते त्याने मान्य केले. गोपीचंद कानीफ व जालंदर हेलापट्टणाहून काही काळानंतर बदरिकाश्रमात गेले. तेथे जालंदराने गोपीचंदाकडून पूर्ण तप करून घेतले व सर्व मंत्र देवतांकडून सिद्ध करून दिले.

१७. गोरक्ष स्त्रीराज्यात पोहोचला!

गोरक्षनाथ मच्छिंद्राचा शोध घेण्यासाठी स्त्रीराज्याजवळ आला. स्वत:च्या रूपात आत जाऊन मच्छिंद्राला बिथरवून टाकणे योग्य नाही असे ठरवून तो वेषांतर करून स्त्रीचे रूपात सीमेजवळ थांबला. त्याला काही नर्तिका स्त्रीराज्यात जात आहेत असे दिसले. कलिंगा नावाची नर्तिका मुख्य होती. तिला भेटून गोरक्षाने "मला तुमच्या नर्तिकांबरोबर घ्या. मला गायनवादन चांगले येते" अशी विनंती केली. विश्वास बसावा म्हणून त्याने मृदंग फारच उत्तम प्रकारे वाजवून दाखविला. मंत्रप्रभावाने त्याने वृक्षवेलींनाही गायन करायला लावले. कलिंगा नायिकेने ते पाहून व ऐकून स्त्रीरूपी गोरक्षाला

बरोबर नेण्याचे ठरविले. स्त्रीराज्यात जी काही प्राप्ती होईल त्याचा काही वाटा तिला देण्याचे मान्य केले. 'पूर्वडा' असे आपले स्त्रीनाम गोरक्षाने सांगितले.

नर्तिकांचा जथा स्त्रीराज्यात आला. कलिंगा नायिकेने गोरक्ष कोण आहे ते ओळखले होते. तो स्त्रीरूपात होता म्हणून ठीक होते. ती म्हणाली, "मारुती इथला रक्षक आहे. पुरुष येथे शिरला तर मरतो. तू स्त्री म्हणूनच रहा."

गोरक्ष म्हणाला, "मी सिद्ध मंत्रांचा प्रयोग करून मारुतीला बंधन करतो. तुम्ही काही काळजी करू नका." त्याने वज्रास्त्र, स्पर्शास्त्र, मोहनास्त्र व नागास्त्र यांचा प्रयोग सीमेवरच करून ठेवला. मग कलिंगा व सर्वजणी राज्यात शिरल्या. चिनापट्टण या गावात त्यांनी रात्री वस्ती केली.

रात्री मारुती सीमेवर आला, तो वज्रादी अस्त्रांमुळे तेथेच भूमीला खिळून राहिला. मारुतीने रामाचा धावा केला तेव्हा राम प्रकटला व त्याने सर्व अस्त्रांतून मारुतीची सुटका केली. गोरक्षनाथाचेच हे अस्त्रबळ आहे हे रामाने ओळखले. मारुती व राम ब्राह्मणाच्या वेषात रात्री चिनापट्टण गावात गेले. गोरक्ष गुरुस्मरण करीत एकटाच बसला होता. त्यांनी त्याची भरपूर स्तुती केली. गोरक्ष प्रथम मनुष्यस्वभावाला अनुसरून प्रसन्न झाला व म्हणाला, "तुमची काय इच्छा आहे?" ते म्हणाले "आम्ही याचक ब्राह्मण, तू आम्हाला वचन दे, नाहीतर निराश करशील." तेव्हा गोरक्ष सावध झाला. आपली अस्त्रबंधने ओलांडून हे पुरुष स्त्रीराज्यात आले कसे? हे तीन देवांपैकी कोणीतरी किंवा मारुती किंवा नाथ असणार, असा तर्क त्याने केला. त्याने पटकन आपला संशय बोलून दाखविला व म्हटले, "मी स्वत: गरीब भिक्षेकरी, मी तुम्हाला काय देणार? काही सेवा असेल तर सांगा."

राम व मारुती यांनी आपले खरे रूप प्रकट केले आणि 'मच्छिंद्राला परत नेऊ नये' अशी विनंती केली. पण गोरक्ष म्हणाला, "माझ्या गुरूंनी नाथपंथाच्या दृष्टीने हे चांगले केले नाही. त्यांना नेण्यासाठीच मी आलो आहे. तुम्ही कशाला आड येता? मी माझा निश्चय सोडणार नाही." मारुती त्यावेळी रागावला. पण रामाने त्याला शांत केले. "तुम्ही दोघे माझे भक्त आहात. गोरक्षाचे म्हणणे योग्य आहे. मच्छिंद्राला आता स्त्रीराज्यातून जायला हवे. तुझ्या वचनातूनही त्याने तुझे कार्य करून मुक्त केले आहे." असे म्हणून राम त्या दोघांचे सख्य करून स्वस्थानी गेला. तत्पूर्वी गोरक्षाने मारुतीवर अस्त्रबंधन घातल्याबद्दल रामाची क्षमा मागितली!

मारुती त्यानंतर मैनाकिनीला भेटण्यासाठी गुप्तपणे पुढे गेला. ती शृंगमुरुड या नगरात राहात होती. मारुती तिला भेटून म्हणाला, "पद्मिनी मैनाकिनी, मच्छिंद्राने तुझ्याबरोबर संसार केला आहे. तुला मीननाथ हा पुत्रही त्याच्यापासून झाला आहे. आता तुला मी दिलेले वचन व उपरिचर वसूने तुला दिलेला शाप पूर्ण झाला आहे. तेव्हा मच्छिंद्र व मीननाथ आता तुला सोडून जातील त्यांना जाऊ दे. गोरक्ष इथे येईल त्याला तू काही उपाय करून थांबव, पण स्त्रीचा मोह त्याला मुळीच पडणार नाही. त्या फंदात तू पडू नकोस." मारुती असे सांगून निघून गेला.

उपरिचर वसूला सिंहलद्वीपात मैनाकिनीने पूर्वी अर्धनग्न स्वरूपात पाहिले होते व ती हसली होती. तेव्हा त्याने तिला शाप देऊन "जेथे पुरुष आला तर मरून जाईल अशा स्त्रीराज्यात राहशील व तुला कोणीही पुरुष दिसणार नाही" असा शाप दिला. "मारुती सीमेवर राहील. त्याच्या भुभुःकाराने तेथील स्त्रियांना स्त्रीसंततीच होईल. तू मारुतीकडून अंगसंगाचे व पुत्रप्राप्तीचे वरदान मागून घे. तो स्वतः ते न करता मच्छिंद्रनाथाला सांगेल. तो नाथ माझ्याच अंशाने देह धारण केलेला 'कवि' नारायण ऋषी असेल. त्यापासून तुला मीननाथ

नावाचा पुत्र होईल. तो मीच असेन. मच्छिंद्र व मीननाथ तुला सोडून जातील तेव्हा तुझी शापातून मुक्तता होईल." असे सर्व घडून यावयाचे होते.

मैनाकिनीला शाप मिळताच तिला स्वत: कोण याचा विसर पडला. ती स्त्रीराज्यात शिरली. शृंगमुरुड गावात एका स्त्रीच्या घरी ती स्वयंपाक करून राहू लागली. कीलोतला नावाची तेथे राणी होती. तिच्यामागून राणी कोणी व्हावे हे हत्तिणीच्या सोंडेत माळ देऊन ठरविण्यात आले. हत्तिणीने मैनाकिनीच्या गळ्यात माळ घातली व ती राणी झाली. तिला कीलोतला असेच नाव पडले. तिने नंतर मारुतीची आराधना करून हवे ते वरदान मिळविले. अर्थात् मच्छिंद्रनाथाकडून मारुतीने तिचे इष्ट कार्य करून दिले होते.

मैनाकिनी आता पुढील विरहघटकेची धास्ती घेऊन राहिली होती!

१८. चलो मच्छिंदर गोरख आया!

स्त्रीरूपात गोरक्ष व कलिंगा, नर्तकींच्या जथ्यासह शृंगमुरुड गावात आली. नृत्याचा कार्यक्रम करताना 'पूर्वडा' अर्थात गोरक्ष मृदंग वाजवण्याचे काम करी. मैनाकिनी व मच्छिंद्र यांनी राजमहालात नृत्याचा कार्यक्रम ठरविला. गोरक्षाला स्त्रीरूपात कोण ओळखणार? नर्तन चालू झाले. कलिंगाचा नाच व मृदंगाचा ताल अगदी बरोबरीने चालले होते. गोरक्ष मच्छिंद्राकडे पाहात पाहात मृदंगातून हुबेहूब माणसासारखे बोल काढू लागला. "चलो मच्छिंदर गोऽरख आयाऽ" असा ध्वनी उमटू लागला. तो ऐकून मच्छिंद्र दचकला. मृदंग वाजविण्याची कमाल झाली. मच्छिंद्र व मैनाकिनी

यांनी मूल्यवान् भूषणे व हार त्याच्या अंगावर फेकले! इतर स्त्रियांनीही मृदंग वाजविला तेव्हाही "चलो मच्छिंदर गोरख आया" असाच ध्वनी उमटू लागला. सभा त्याच आवाजाने दुमदुमत होती! मच्छिंद्राची मुद्रा काळवंडली. मैनाकिनीला तो म्हणाला, "मृदंगातून ध्वनी येतो तो खरा ठरला तर गोरक्षनाथ इथे येईल. मग मला जावे लागेल."

मैनाकिनीने स्त्रियांना इतर वाद्ये वाजविण्यास सांगितले. तर त्या वाद्यांतून तसाच आवाज येऊ लागला. तेव्हा तिने तर्क केला की या नर्तकींतच कोठेतरी गोरक्ष आहे. मृदंगवादक स्त्रीला तिने गुरूची शपथ घालून सत्य प्रकार काय ते विचारले तेव्हा गोरक्ष (पूर्वडा) म्हणाला – "मी स्त्री नाही. मीच गोरक्ष आहे. मच्छिंद्र हे माझे गुरू आहेत. त्यांना न्यायला मी आलो आहे!"

मच्छिंद्राने तिला म्हटले – "तू गोरक्ष असशील तर मूळ रूपात प्रकट हो!" गोरक्ष मूळ रूपात प्रकट झाला!

मैनाकिनीला नवल वाटले! नर्तिका कलिंगा हिला भरपूर धन देऊन तिने बोळविले. मच्छिंद्र व गोरक्ष यांनी एकमेकांना आनंदाने मिठी मारली! गोरक्ष व मीननाथ यांना मच्छिंद्राने सारख्याच प्रेमाने जवळ घेतले! मैनाकिनीलाही गोरक्षाबद्दल वात्सल्य वाटले! तिला वाटले – 'गोरक्षही इथे राहील तर किती उत्तम होईल!'

गोरक्ष व मच्छिंद्र रात्रभर गोष्टी बोलत बसले!

१९. मच्छिंद्राने स्त्रीराज्य सोडले!

गोरक्षाला मैनाकिनी जास्त मायेने वागवू लागली. स्त्रीराज्यातून मच्छिंद्राला बाहेर घेऊन जाण्याचा त्याचा विचार पालटण्याचा तो

एक प्रयत्न होता. पण कितीही प्रलोभने दाखविली तरी गोरक्षावर काही परिणाम झाला नाही. त्याने मच्छिंद्राला वारंवार एकांतात भेटून 'मोहावर विजय मिळवा आणि मैनाकिनीला सोडून बाहेर चला' असा लकडा लावला. तेव्हा 'एक दिवस मी तुझ्याबरोबर नक्की येईन' असे वचन मच्छिंद्राने दिले. मैनाकिनीने गोरक्षाजवळ दुसरेच बोलणे काढले. "मच्छिंद्रनाथ, मीननाथ व गोरक्ष यांनी राज्य सांभाळावे" असे विचार ती त्याला पटवून देऊ लागली. पण गोरक्षाने काहीच एकले नाही. सहा महिने तेथे राहावे व गुढीपाडव्याला राज्यसीमेबाहेर पडावे असे मच्छिंद्र व गोरक्ष यानी ठरविले. गुढीपाडवा आला आणि मैनाकिनीच्या विनवण्या, प्रलोभने, माया, सर्व काही बाजूस सारून गोरक्ष व मच्छिंद्र निघाले. मीननाथालाही बरोबर घेऊन जावे असे मैनाकिनीने सुचविले. मच्छिंद्राचा त्याला फार लळा होता व मीननाथ फार लहान होता, तेव्हा त्यालाही बरोबर घ्यावे असे ठरले. नाथपंथाची सर्व सामग्री मच्छिंद्राने बरोबर घेतली. आला होता तसाच गोसावी बनून तो निघाला. पण गोरक्षाचे लक्ष नाही असे पाहून मैनाकिनीने सोन्याची एक वीट मच्छिंद्राच्या झोळीत घातलीच! आपल्या प्रिय पतीला व मुलाला वाटेत उपास पडू नयेत याची तिला केवढी काळजी!

मायापाश तोडून स्त्रीराज्य सोडून तिघे निघून गेले! मैनाकिनी रडत बसली, पण खरोखरी ती शापमुक्त झाली होती. हा दिवस तिच्या दृष्टीने आनंदाचा होता, पण तिला त्याचे स्मरण नव्हते. उपरिचर वसूने त्यावेळी तिथे येऊन तिचा शोक दूर केला. तिला पूर्वी दिलेल्या शापाची व उःशापाची आठवण करून देऊन तो तिला तिच्या मूळच्या सिंहलद्वीपात घेऊन गेला. बारा वर्षांनी मीननाथासह मच्छिंद्रनाथ पुन्हा सिंहलद्वीपात येतील, एक मोठा यज्ञ होईल तेव्हा ते भेटतील असे त्याने सांगितले. स्त्रीराज्यात राणीपदावर दैर्भामा नावाच्या मुख्य दासीला बसविले. उपरिचर वसूने मैनाकिनीला

तिच्या मूळ स्थानी नेले, पूर्वस्मरण दिले आणि तो अंतरिक्षात निघून गेला.

२०. मीननाथाला पार धुतले!

इकडे मच्छिंद्रनाथाला गोरक्षाने, 'कानीफनाथ कसा भेटला व त्याने स्त्रीराज्याचा पत्ता कसा सांगितला' ते सर्व कथन केले. गोरक्षाने गोपीचंद, मैनावती व जालंदर यांची कथाही सांगितली. मच्छिंद्राने हेलापट्टण येथे गोरक्षासह जाऊन मैनावतीची भेट घेतली. नंतर मच्छिंद्र मीननाथ व गोरक्ष फिरत फिरत एका गावात गेले. गावाबाहेर त्यांनी वस्ती केली. सकाळी मच्छिंद्राच्या आज्ञेने गोरक्ष भिक्षा मागण्यासाठी गावात गेला. मच्छिंद्राने मीननाथाला उठविले व प्रातर्विधी करण्यासाठी एका आडजागी बसविले. गोरक्ष घरी परत आला. मच्छिंद्रापुढे भिक्षा ठेवली. क्षणभर विश्रांती घेतली. तेवढ्यात मच्छिंद्राला मीननाथ बहिर्दिशेस बसला होता त्याची आठवण झाली. तो म्हणाला, 'अरे, विसरलोच. मीननाथ केव्हाचा शौचास बसला आहे! जा, त्याला नदीवर नेऊन चांगला धुवून निर्मळ करून आण." गोरक्ष उठला. बाहेर जाऊन पाहतो तो काय! लहान मीननाथ! त्याने सर्व अंग घाण केलेले! याला निर्मळ करण्यास गुरूंनी सांगितले आहे! गोरक्षाने मुलाला तसेच उचलले व नदीत बुडविले, बाहेर काढले, वस्त्र धुतात त्याप्रमाणे खडकावर आपटले. मीननाथ मेला. त्याचे रक्त प्रवाहात पडले ते माशांनी खाऊन टाकले. गोरक्षाला प्राण्यांची पोटे भरत आहेत याचे बरे वाटले. त्याने मीननाथाची फक्त कातडी शिल्लक ठेवली, मांस, हाडे, शिरा, आतील सर्व इंद्रिये काढून

पाण्यात टाकली. कातडी घराच्या छपरावर वाळत घातली! मीननाथाला त्याने 'अगदी निर्मळ' केले होते!

मच्छिंद्राला स्त्रीराज्यात असताना मद्यपानाची सवय लागली होती. त्यासाठी तेवढ्या वेळात तो बाहेर गेला होता. परत आला तो मीननाथ कोठे दिसेना. त्याने गोरक्षाला विचारले तर तो म्हणाला, "मी छपरावर वाळत घातला आहे" मच्छिंद्र घाबरला. छपरावरून गोरक्षाने मीननाथाचे कातडे खाली काढले. मच्छिंद्र मुलासाठी आक्रोश करू लागला! आपला गुरू मायेत किती गुरफटला आहे हे पाहून गोरक्षाने त्याला विरक्तीचे शब्द ऐकविले, आणि तो फारच ऐकेना तेव्हा संजीवनी मंत्राने भस्म त्या कातडीवर टाकून मीननाथाला पुन्हा जिवंत केले! मच्छिंद्रनाथाला त्या मुलाने मिठी मारली!

गोरक्षाला मग मच्छिंद्र म्हणाला – "मीननाथ हा मायेच्या क्षेत्रातला, आभास आहे, असे तू म्हणालास, पण मी रडलो हेही तसेच आभासात्मक आहे; आणि त्याची विष्ठा पाहून तुला घाण का वाटली? ती वृत्ती तरी खरी होती का? अरे, सगळीच माया आहे हे तू कधी शिकशील? व्यावहारिक सत्ता मायेच्या क्षेत्रात चालते ती तेवढीच धरायची. संजीवनी विद्येचा असा गर्व करू नकोस. पाण्यातील मासे, त्यांची भूक, तुला त्यांच्यावर उपकार करतो असे वाटणे हे तरी खरे का म्हणून? दुसरा काही करतो हे त्याचे भ्रममूलक, आणि तुझे करणे मात्र सत्य, असे आहे तुझे म्हणणे. आपले शरीरच मायेचे, मलरूप आहे. मीननाथाची त्वचा तरी सत्य कां मानलीस?"

गोरक्षाचे डोळे उघडले! मारुतीचे वचन पाळण्यासाठी व त्याचे ब्रह्मचर्य टिकावे म्हणूनच मच्छिंद्राने संसार केला! आणि तो मायेत गुंतला असे मानून मी त्याला सोडविण्याचा खटाटोप केला, असे

त्याच्या मनात आले, तो खजील झाला; पण गुरूला शिकविण्याची त्याची वृत्ती अजून कायमच होती! ती कशी?

२१. सोन्याची वीट

सौराष्ट्र प्रांतातून मच्छिंद्र, गोरक्ष व मीननाथ पुढे जात असता घनदाट अरण्यात शिरले. मैनाकिनीने सोन्याची वीट मच्छिंद्राच्या झोळीत टाकलेली होती. मच्छिंद्राने गोरक्षाची पुन्हा परीक्षा घेण्याचे ठरविले. "चोरांची भीती आहे, जरा पुढे जाऊन टेहळणी कर, मग आपण पुढे जाऊ!" असे म्हणत तो आपली झोळी वारंवार चाचपून पाहू लागला. गोरक्षाने भीतीचे कारण सोन्याची वीट आहे हे ओळखले, पण तसे न दर्शविता तो म्हणाला, "गुरुजी, भिण्याचे काहीच कारण नाही." पुढे रानातून जाताजाता मच्छिंद्र म्हणाला – "मुला, ही झोळी जरा सांभाळ, मी दुसऱ्या दिशेस जाऊन येतो." झोळी देऊन मच्छिंद्र दृष्टीआड झाला. 'गुरूला भय वाटते ते सोन्याची वीट जवळ आहे म्हणूनच. ते भयाचे कारणच दूर करावे' असे ठरवून गोरक्षाने ती वीट फेकून दिली व त्याच वजनाचा एक दगड झोळीत ठेवला व मीननाथाला घेऊन तो पुढे निघाला. काही अंतरावर एका तळ्याशी तो थांबला. काही वेळाने मच्छिंद्र मागून धावत आला. तळ्यात दोघांनी व मीननाथानेही स्नान केले. मच्छिंद्राने विचारले, "मुला, तू पुढे आलास, तुला रानात भय वाटले नाही का?" तो म्हणाला, "छे, भय कसले? भय मागेच राहिले!"

मच्छिंद्राने आपली झोळी चाचपून बघितली. आत हात घातला तो हाताला दगड लागला. मच्छिंद्र 'माझे सोने गेले!' म्हणून रडू लागला. गोरक्षाने वीट कोठे फेकली ते विचारून तिथे जाऊन

गवतात चाचपडत शोधू लागला! गोरक्षाने विचारले, "एवढा त्या सोन्याचा लोभ कसला धरता? काय करायचे सोने तुम्हांला?" मच्छिंद्र म्हणाला, "अरे! आपल्या देशात जाऊन साधूंना भोजन घालावे अशी इच्छा होती, म्हणून सोन्याची वीट ठेवली होती. मोठ्या कामाला जास्त द्रव्य लागेलच."

गोरक्ष म्हणाला, "एवढेच ना! मी तुमचे कार्य होईल अशी व्यवस्था करतो."

गोरक्षाने चित्रसेन गंधर्वाला मंत्राने आवाहन करून त्याला मच्छिंद्राच्या वतीने सर्व देवता व ऋषी यांना भोजनास बोलावण्यास सांगितले. कोठे बोलवायचे? गोरक्षाने मच्छिंद्राला आपल्या योगसामर्थ्याने समोरचा डोंगरच सोन्याचा करून दिला होता आणि मगच भोजनाची योजना करायला चित्रसेनाला सांगितले होते!

फार मोठ्या संख्येने सर्व देवगण व ऋषी कनकगिरीवर उत्तम दिव्य अन्न सेवून तृप्त झाले!

त्यावेळी गोरक्षाला आठवण झाली गहिनीची. मधु ब्राह्मणाच्या घरी तो मातीच्या पुतळ्यातून सजीव केलेला बालक ठेवला होता. मच्छिंद्राची आज्ञा घेऊन गोरक्षाने सुरोचन गंधर्वाला सांगून मधु ब्राह्मणाकडून गहिनीला बोलावून घेतले. ब्राह्मण स्वत: मुलाला घेऊन आला.

साक्षात् शंकर त्यावेळी भोजनासाठी आले होते. त्यांनी गहिनीला जवळ घेतले. "हा करभाजन ऋषी आहे. याचा शिष्य म्हणून मी स्वत: अवतार घेणार आहे" असे म्हणून शंकराने गोरक्षाकडून त्याला तेथेच गुरुदीक्षा देवविली. मधु विप्राला शंकराचे दर्शन झाले होते! त्याला नाथांनी सांगितले, "हा मुलगा सात वर्षांचा आहे. आणखी एक वर्षाने हा तुमच्याकडे परत येईल. पुढे चार वर्षे तुम्ही याचा प्रतिपाळ करावा."

मधु विप्र परत गेला. गहिनीने एक वर्ष योगाभ्यास केला. गोरक्षाने कुबेराकडून वस्त्रेभूषणे घेऊन सर्व देव व ऋषी यांचा मान केला व त्यांनी स्वस्थानी गमन केले. कनकगिरी हाच गर्भाद्रि! कुबेराने तो पर्वत अदृश्य केला. पण त्या ठिकाणी शंकर गिरिदेवतेच्या रूपात कायम राहिले. गहिनीला एक वर्षाने मधुविप्राकडे पाठविण्यात आले.

उपरिचर वसूने मीननाथाला – त्याला आईची फार आठवण येत होती म्हणून – मैनाकिनीकडे सिंहलद्वीपात पोहोचविले. मच्छिंद्र तुला पुन्हा भेटतील असे तिला आश्वासन दिले व तो स्वर्गात गेला.

गर्भाद्रि स्थानीच शके दहाशेच्या सुमारास मच्छिंद्र, जालंदर, कानीफ व गहिनी गुप्त झाले. त्यांनी समाधी घेतली, पण त्यांचे आकार कबरीसारखे करून घेतले. त्यामुळे लोक त्यांना जानपीर इत्यादी नावांनी ओळखू लागले व मुसलमानी राज्यातही त्या समाध्या धर्मवेडापायी उखडल्या गेल्या नाहीत. पण ही गोष्ट फार पुढची आहे. नाथांच्या गोष्टी अजून आहेत. त्या पहा.

२२. भर्तरी-हरिणींनी वाढविलेला मुलगा!

सर्व नाथांचे जन्म अलौकिक प्रकारे झाले आहेत. ते देवतांच्या अंशापासून देह धारण करूनच जन्माला आले. देह घडला तो ब्रह्मदेव, सूर्य आदी देवांच्या तेजापासून आणि त्या देहांत जीव चैतन्य आले ते नवनारायणांचे – एकेका ऋषीने अशा प्रकारे विष्णूच्या कार्यासाठी अवतार धारण केले. भर्तरीनाथ हा नवनाथांपैकी एक. याचा जन्म कसा झाला? कौलिक ऋषींच्या आश्रमात बाहेर अंगणात त्यांनी भिक्षापात्र जरा वेळ ठेवले होते. ते थोडा वेळ आश्रमात गेले. तेवढ्यात सूर्याचे तेज ऊर्वशी नावाच्या अप्सरेच्या

आकर्षणामुळे उत्पन्न झाले ते त्या पात्रात पडले. भिक्षापात्राला कोणी भर्तरी असेही म्हणतात. त्या सूर्याच्या तेजात पुढे द्रुमिल नारायणाने यथाकाळ प्रवेश केला. त्याचे असे झाले की कौलिकांनी ते पात्र कलियुग आल्यावर मंदरपर्वतावर एका गुहेत ठेवले. पुढे त्यात मधमाशांनी पोळे केले. त्या सूर्यतेजात द्रुमिलाने प्रवेश केला आणि तेथे एक बालक उत्पन्न झाला.

मधावरच तो बालक काही काळ जगला. पुढे दरडीचा एक दगड पडून ते पात्र फुटले व मधमाशा दूर गेल्या. बालक बाहेर पडून डोंगरावरून घरंगळत थोडा खाली कुरणावर आला व रडू लागला. तेवढ्यात तेथे हरिणींचा कळप आला. एका हरिणीने तिथेच दोन शावकांना जन्म दिला. तो बालक मिळून आपल्याला तीन पिले झाली आहेत असे त्या हरिणीला वाटले व तिने त्यालाही युक्तीने आचळातील दूध पाजले. हरिणी त्याचे संगोपन करू लागली. बालक पशूंच्या सहवासात वाढला त्यामुळे त्याला हरिणीची व इतर पशूंचीही भाषा ऐकून तीच अवगत झाली. तो मानव असून हरिणाप्रमाणेच बेंबें करायचा व हातापायांनी चालायचा. सतत हरिणीच्या मागोमाग जायचा.

एकदा त्या वनातून जयसिंग व रेणुका असे एक दांपत्य चालले होते. ते गायक होते. भाट होते. त्या जयसिंगाला तो मुलगा पाहून फार आश्चर्य वाटले. तो माणसाचा मुलगा आहे असे ओळखून त्याने धावत जाऊन त्याला पकडले, दोन पायांवर उभे धरले व तू कोण, कोणाचा असे प्रश्न तो त्याला विचारू लागला. पण 'बें बें' याशिवाय त्याला आणखी काही बोलता येईना. त्याने त्या मुलाला आपल्या बरोबर घेतले. त्याच्या आईचा शोध लावावा आणि तिच्या ताब्यात मुलाला द्यावे असा विचार करून त्या दोघांनी, हरिणी ओरडत मागे लागली असतानाही त्या बालकाला झपाट्याने वनाबाहेर आपल्या वस्तीत नेले.

आता तो बालक माणसांच्या वस्तीत राहून हळूहळू मानवी भाषा बोलू लागला. जयसिंगाने प्रयत्नपूर्वक त्याला शिकविले. त्याच्या आईचा शोध काही लागला नाही.

पुढे ते दांपत्य तीर्थयात्रा करीत काशीस गेले. विश्वनाथाचे दर्शन घेण्यासाठी ते गाभाऱ्यात गेले तेव्हा त्या मुलाला उद्देशून पिंडीतून देवाची वाणी प्रकट झाली. "या द्रुमिल नारायण! या भर्तरीनाथ! आता अवतार घेतलात म्हणायचा!"

ते ऐकून ते दांपत्य चकित झाले. त्या मुलाकडे पाहून त्यांना नवल वाटू लागले. हा अवतारी ऋषी शंकराच्या परिचयातला आहे हे कळून त्यांनी फार प्रेमाने त्याला वाढविले. काशीक्षेत्रातच जयसिंग भिक्षुकी करून राहू लागला.

पुढे एकदा काय झाले, आपल्या सवंगड्यांबरोबर भर्तरी नगराबाहेर खेळायला गेला होता. खेळताना त्याला ठेच लागली व तो बेशुद्ध पडला. त्याचे सवंगडी त्याला उठवू लागले पण तो उठेना. तो मेला असे वाटून मुले भिऊन पळून गेली.

आकाशात सूर्याने हे पाहिले. त्याने ब्राह्मणाचे रूप घेतले. मुलाला शुद्धीवर आणले व घरी पोहोचविले. त्या ब्राह्मणाचे उपकार जाणून रेणुकेने त्याचा सत्कार केला व कोण कोठले म्हणून चौकशी केली. तिचे सरळ मन पाहून सूर्याने तिला आपले खरे रूप सांगितले व भर्तरीचा जन्म कसा झाला ते समजावून सांगून, 'द्रुमिल ऋषींचा हा अवतार आहे' असे सांगितले व त्याचा प्रतिपाळ करा, मी साहाय्य करीन असे आश्वासन देऊन तो अदृश्य झाला!

त्या दांपत्याने भर्तरीला वाढविले. तो सोळा वर्षांचा झाला. ते दांपत्य आपल्या स्वदेशी, माळव्यात परत निघाले. वाटेत चोरांनी त्यांना गाठले, सर्व काही लुटले. नवराबायको दोघांना ठार मारले! भर्तरी दूर गेला होता तो परत आला तोपर्यंत हा प्रकार घडला.

भर्तरीला फार दु:ख झाले. रानातच त्यांच्यावर अग्निसंस्कार करून तो दरिद्री स्थितीत रानातच कंदमुळे, फळे खाऊन राहू लागला. योगायोगाने वंजारी व्यापाऱ्यांचा एक तांडा अरण्यातून जात होता. त्यांनी या अनाथ तरुणाला पाहिले. त्याची चौकशी केली. त्याला आश्रय दिला. तो देखणा व सद्‌गुणी होता, त्याला अनेक कामे येत होती हे पाहून त्यांनी त्याला प्रवासात आपल्या बरोबर घेतले. पुढे ते व्यापारी भरपूर खरेदी-विक्री करीत गावोगाव हिंडत अवंतीनगरीकडे निघाले.

२३. भर्तरीच्या ज्ञानाचा उपयोग

व्यापारी नगरीच्या बाहेरच काही अंतरावर अरण्यात तळ टाकून राहिले. रात्र झाली. रानातून कोल्ह्यांच्या ओरडण्याचा आवाज आला. ते तळाजवळ येऊन फारच ओरडू लागले. व्यापारी त्रस्त झाले. पण भर्तरीला प्राण्यांची भाषा येत होती. त्याने व्यापाऱ्यांना सांगितले, "मला प्राण्यांची भाषा समजते. ते कोल्हे तुम्हाला इशारा देत आहेत की रानातून चोरांची एक टोळी येत आहे, सावध रहा." तेव्हा व्यापारी तयारीत राहिले. चोरांची टोळी आली. व्यापाऱ्यांनी चोरांशी हातघाई करून त्यांना पिटाळून लावले. व्यापाऱ्यांनी भर्तरीचे फार आभार मानले. रात्री उशिरा पुन्हा कोल्हे ओरडू लागले. व्यापारी म्हणाले, "मुँला, यावेळी हे कोल्हे काय सांगत आहेत?" भर्तरी म्हणाला – "यावेळी कोल्हे आपसात असे बोलत आहेत की या रानातून एक वाटसरू उत्तरेकडून दक्षिणेकडे चालला आहे. तो राक्षस आहे. त्याला शंकराचा वर आहे की यातून त्याला लवकरच मुक्ती मिळणार आहे. त्याच्याजवळ चार रत्ने आहेत. जो त्या

राक्षसाला मारून त्याच्या रक्ताचा टिळा आपल्या कपाळी लावील, त्याच्या रक्तात आपले वस्त्र भिजवील व रक्ताचा एक टिळा अवंती नगरीच्या द्वाराला लावील त्याला अवंती नगरीत मोठा लाभ होईल. तो राजा होईल."

भर्तरीचे बोलणे ऐकून व्यापारी अचंबा करू लागले, पण राक्षसाला मारण्याची तयारी कोणाचीच नव्हती. त्या व्यापाऱ्यांजवळच जकात वसूल करणारा विक्रम नावाचा एक तरुण उभा होता. तो गुपचूपपणे त्या राक्षसाला मारण्यासाठी निघून गेला. तो शूर होता. सशस्त्र होता. हा विक्रम कोण? मोठी कथाच आहे ती! भर्तरीच्या ज्ञानाचा त्याला कसा उपयोग झाला? तो राक्षस कोण होता?

हा राक्षस पूर्वी चित्रमा नांवाचा शंकराचा आवडता गंधर्व होता. शंकरपार्वती सारीपाट खेळत असताना दान किती पडले यावरून वाद झाला. तेव्हा त्यांनी या गंधर्वाला न्याय करण्यास सांगितले. त्याने पार्वतीच्या बाजूने मत दिले. शंकर रागावला. तू राक्षस होऊन रानात हिंडत राहशील असा शाप दिला. राक्षसयोनीतून आपली सुटका व्हावी असा उ:शाप त्याने मागितला. तेव्हा शंकर म्हणाला, "सुरोचन गंधर्वाचा पुत्र तुला त्या देहात मारील, तुझ्या रक्ताचा टिळा स्वत:च्या कपाळी लावील. एक टिळा अवंतीनगरीच्या प्रवेशद्वारावर लावील. तुझ्या रक्तात स्वत:चे वस्त्र भिजवील, त्याने तू पुन्हा गंधर्व होशील व तो राजा होईल."

तेव्हा चित्रमा गंधर्वाने एका अंशाने राक्षसजन्म घेतला. त्याचा वध करण्यासाठी जो तरुण निघाला होता तोच विक्रम – तो तिथे कसा आला? सुरोचन गंधर्वाचा तो पुत्र कसा?

२४. गंधर्व गाढव झाला

सुरोचन गंधर्वाला इंद्रसभेत ऊर्वशीबद्दल मोह निर्माण झाला तेव्हा इंद्र रागावला आणि तू गाढव होशील असा त्याला शाप दिला. तो दु:खी झाला. उ:शाप मागू लागला. तेव्हा इंद्र म्हणाला, "तुला मानवी वाणीने बोलता येईल, तुला असलेल्या अष्टसिद्धी कायम राहतील. मथुरेचा राजा सत्यवर्मा याची कन्या सत्यवती हिचा विवाह तुझ्याशी होईल. तुम्हाला पुत्र होईल. तोच विक्रमादित्य. त्याचा जन्म झाल्यावर तू पुन्हा गंधर्व होशील."

शापाप्रमाणे सुरोचन गंधर्व गाढव झाला व मथुरेजवळ रानात हिंडत राहिला. कमठ नावाचा कुंभार आपली गाढवे चारायला तिथे आला. त्याला हे गाढव दिसले. तेव्हा त्यालाही धरून तो मथुरा नगरीत घरी गेला. गाढव झालेला सुरोचन तिथे राहिला. गरिबीमुळे कमठाने आपली इतर गाढवे विकून टाकली. सुरोचन एकटा उरला. कमठाला द्रव्यचिंता लागून राहिली. रात्री झोप येईना. सुरोचनाने मानवी वाणीने म्हटले, "कमठा, चिंता करू नको. सत्यवर्मा राजाची मुलगी सत्यवती हिच्याशी माझा विवाह करून दे. तुझे दारिद्र्य फिटेल."

कमठाला तो वारंवार असे सांगू लागला. गाढव मानवी वाणीने बोलतो आणि असे बोलतो की राजाला जर ते कळले तर आपला तो शिरच्छेद करील अशी भीती वाटून कमठ बायकोला घेऊन त्या गाढवावर आपला गरिबीचा संसार लादून नगराबाहेर चालला. पहारेकऱ्यांनी त्याला हटकले. "नगर सोडून का जाता?" पण ते जोडपे काही बोलेना. तेव्हा त्यांनी गाढवासह त्या कुंभाराला राजाकडे नेले.

भर सभेत राजाने कुंभाराला विचारले, "तू नगर सोडून का जातोस?" पण कमठ प्रथम काही बोलेना. जास्त खोदून विचारले तेव्हा तो म्हणाला, "मी फक्त एकांतात तुम्हाला सांगेन."

राजाने त्याला एकांतात नेले – "हं, आता बोल. भिऊ नकोस." कमठ म्हणाला, "मी काय सांगेन त्यावर मला शिक्षा न करता काय तो उपाय करा. मला अभय द्या."

राजाने अभय दिले. कुंभाराने गाढव काय बोलतो ते सांगितले व भिऊन नगर सोडून जात होतो असे सर्व सांगितले. राजा मोठा धोरणी होता. कुंभाराला म्हणाला, "तू निश्चिंतपणे घरी जा. तो गाढव कोणीतरी शापित गंधर्व किंवा देव असावा. ती परीक्षा आपण करू यां. रात्री गाढवाने तोच हट्ट केला तर त्याला सांग, मी तुझे म्हणणे राजाला सांगितले. 'तू जर मथुरा नगरी तांब्याची करून दिलीस तर तो राजकन्या तुला देईल' अशी अट त्याने घातली आहे."

कमठाने राजाज्ञेने घरी परत जाऊन, रात्री गाढवाने जेव्हा तेच मागणे मागितले तेव्हा त्याला राजाची अट सांगितली. गाढवाने रात्रीतच विश्वकर्म्याला बोलावून मथुरा नगरी तांब्याची करून दिली!

राजाला सकाळी फारच आश्चर्य वाटले. नागरिक तर थक्क झाले. राजाने कमठाला बोलावून म्हटले, "अरे! खराच तो कोणी देव आहे! मी मुलगी देतो पण लोक काय म्हणतील? तू असे कर, मी राजकन्येला नीट समजावून सांगून तुझ्याबरोबर रात्री पाठवितो. तू नगर सोडून जा. तो देव व सत्यवती यांना घेऊन जा. मीही गुप्तपणे तुझ्या घरी येऊन तो गर्दभ पाहतो."

रात्री मुलीला घेऊन राजा गुप्तपणे कमठाच्या घरी गेला. गाढवाला पाहून त्याने त्याचा 'देव' समजूनच मान ठेवला. राजाने सत्यवतीला सांगितले होते की काहीतरी युक्ती करून देवयोनीतील त्या जामाताला गर्दभयोनीतून तिने मुक्त करावे. सत्यवतीने ते मान्य केले, पण प्रत्यक्ष कुंभाराच्या घरात आल्यावर व गाढव पाहिल्यावर तिला रडू

कोसळले! त्यावेळी सुरोचन नावाच्या त्या गंधर्वाने मनुष्यवाणीने म्हटले, "सत्यवर्मन्, सुरोचन नावाचा मी श्रेष्ठ गंधर्व आहे. इंद्राच्या शापाने मी या स्थितीत आलो आहे. उःशापाची वेळ आली की मूळ रूप धारण करीन."

राजाने समाधानाने सुस्कारा टाकला! सत्य कळले. त्याने कुंभाराला रात्रीच नगर सोडून जाण्यास सांगितले. त्याप्रमाणे राजकन्या, तो कमठ, त्याची पत्नी व तो गर्दभ यांनी नगर सोडले व अवंती नगराकडे प्रयाण केले.

२५. विक्रम व भर्तरी यांची भेट

कमठ आपली पत्नी व सत्यवती यांच्यासह अवंतीनगरीत एक लहानसे घर घेऊन राहू लागला. गाढवाचा उपयोग अनेक प्रकारच्या कामासाठी होत होता. कमठ सत्यवतीला मुलीसारखी प्रेमाने वागवी व लोकांनाही सांगे – 'ही माझी माहेरी राहायला आलेली मुलगी आहे!' कमठाने गाढवाला गंधर्वाचे मूळ रूप धारण करण्यास सांगून सत्यवतीची व त्याची भेट घडविली. सुरोचनाचे दिव्य रूप पाहून सत्यवतीला फार आनंद झाला. कमठाने दोघांचा गांधर्वविवाह लावून दिला. रोज रात्री सुरोचन मूळ दिव्य रूपात घरात राही व दिवसा गाढवाच्या रूपाने सर्व कामे करीत राही! काही दिवसांनी सत्यवती गरोदर राहिली. सुरोचन म्हणाला – "तुला मुलगा होईल तो चक्रवर्ती राजा होईल. त्याच्या जन्मानंतर माझा शाप संपेल. मग मी स्वर्गात जाईन पण बोलवाल तेव्हा पुन्हा येईन. तू चिंता करू नको."

योग्य वेळी सत्यवती प्रसूत झाली. मुलगा झाला. त्याचे नाव विक्रम ठेवले. कमठाला व सत्यवतीला आपली सत्यकथा सांगून

सुरोचन स्वर्गात गेला. कमठाने बाळाला सांभाळले. विक्रम सोळा वर्षांचा झाला. बरोबरीच्या तरुण मुलांत तो खेळे. त्याने अल्पकाळातच अनेक विद्या अगवत केल्या. कमठाच्या ओळखीने विक्रमाला नगराच्या सीमेवर जकात वसूल करणाऱ्यांबरोबर काम करायला मिळाले. तेथे तो रमू लागला. त्याने भर्तरीचे बोलणे ऐकले, व्यापाऱ्यांनी चोरांना कसे तोंड दिले ते पाहिले. भर्तरीने 'राक्षस वनातून जात आहे' त्याविषयी जे सांगितले तेही त्याने ऐकले. विक्रम धाडसी व शूर होता. तो तत्काळ राक्षसाचा शोध घेण्यासाठी निघाला. एवढी कथा आपणाला तेविसाव्या गोष्टीत माहीत झाली आहे. आणि विक्रम कोण, तेही आपण आता पाहिले. आता विक्रम काय करतो ते पाहू या.

२६. विक्रमाला राज्यपद

भर्तरीचे बोलणे ऐकून विक्रम लगेच अरण्यात उत्तरेला गेला. राक्षसाला पाहताच त्याने अचानक त्याच्यावर हल्ला करून त्याला ठार मारले. त्याच्याजवळ चार रत्ने सापडली ती घेतली. त्याच्या रक्तात आपले वस्त्र भिजविले. रक्ताचा टिळा कपाळी लावला. राक्षसाच्या देहातून चित्रमा गंधर्व मूळ रूपात बाहेर पडला व स्वर्गात गेला. नंतर विक्रमाने रक्ताचा एक टिळा नगरद्वारावर लावला व व्यापाऱ्यांना भेटला. भर्तरीला पाहिले. भर्तरीची माहिती विचारली. भर्तरी व विक्रम एकमेकांकडे पाहताच मनोमन मित्र झाले. विक्रम जकात नाक्यावर परत गेला. जकात वसूल करणाऱ्या एका सेवकाला त्याने सांगितले, "बाहेर पुष्कळ व्यापारी आहेत त्यांना भेट व सांग – आम्ही तुमच्या मालावर जकात घेणार नाही, पण तुमच्या मंडळीत

भर्तरी म्हणून जो तरुण आहे त्याला काही दिवस आमच्याकडे ठेवा." विक्रम पुढे म्हणाला, "व्यापाऱ्यांकडून किती कर घ्यायचा ते मला सांग. तेवढा मी भरीन म्हणजे हिशेब ठीक होईल." जकातवाल्याने व्यापाऱ्यांची त्याप्रमाणे समजूत घालून भर्तरीला बोलावून घेतले. व्यापारी भर्तरीला चौकीवर ठेवून नगरात माल घेऊन गेले. जकातीची रक्कम किती ते सेवकाने विक्रमाला सांगितले. तेव्हां विक्रमाने आपल्याजवळच्या चार रत्नांपैकी एक रत्न द्रव्याऐवजी त्याच्याजवळ ठेवण्यास दिले. त्या रत्नाचे मोल खूपच जास्त होते!

भर्तरीला घेऊन विक्रम कमठाच्या घरी गेला व म्हणाला, "आई! हा भर्तरी नावाचा अनाथ मुलगा आहे, त्याला मी भाऊ मानला आहे. आता हा आपल्याकडे राहील." आणि आईने हो म्हटले. जेवण झाल्यावर विक्रमाने भर्तरीची विद्या, राक्षसाची गोष्ट, स्वत:चा पराक्रम व रत्ने हे सर्व आईला सांगितले. सत्यवतीला मोठे नवल वाटले. कमठपत्नी व कमठ यांनाही आनंद झाला. भर्तरी विक्रमाबरोबरच अवंती नगरीच्या वेशीपाशी जकात वसुलीचे काम करू लागला व विक्रमाचा भाऊ म्हणून विक्रमाकडेच राहू लागला.

अवंती नगरीचा राजा शुभविक्रम. त्याची कन्या सुमेधावती उपवर झाली होती. तिचा विवाह करण्याचे त्याने ठरविले. प्रधानाच्या सल्ल्याने त्याने हत्तीच्या सोंडेत माळ दिली व हत्ती मोकळा सोडला. सर्व नगरभर हत्ती हिंडला. ज्याच्या गळ्यात हत्ती माळ घालील तो राजाचा जावई होणार असे घोषित केले होते. हत्ती जकात चौकीपर्यंत आला व विक्रमाच्या गळ्यात त्याने माळ घातली. सगळीकडे विक्रमाचे कौतुक झाले. या तरुणाचे नांव विक्रम असून हा कमठ नांवाच्या कुंभाराकडे राहतो असे राजाला कळले. कमठाला बोलावून राजाने त्याची व विक्रमाची पूर्ण चौकशी केली. मथुरेचा राजा सत्यवर्मा याची कन्या सत्यवती हिचा विक्रम हा पुत्र आहे असे राजाला कळले. राजा कमठाला व सत्यवतीला घेऊन मथुरेला गेला.

कमठाने सत्यवर्माची भेट घेऊन सत्यवती व सुरोचन गंधर्व यांचे लग्न झाले व त्यांना पुत्र झाल्यावर सुरोचन गंधर्वलोकी गेला हे सर्व सांगितले व आपण सत्यवतीसह विक्रमाचा सांभाळ कसा केला आणि आता अवंती नगरीचा राजा त्याला जावई करून घेणार आहे हे सर्व सांगितले. मथुरा नरेश व अवंतीनरेश यांची भेट झाली. सत्यवर्मा राजाने विक्रम हा आपलाच नातू आहे असे सांगितले. दोघे राजे अवंतीला परत आले. विक्रम व सुमेधावती यांचा विवाह मोठ्या थाटात पार पडला. मथुरानगरीचे राज्य सत्यवर्माने विक्रमाला दिले. विक्रमाने भर्तरीला युवराजपद दिले. शुभविक्रमाने अवंतीचे राज्यही विक्रमाला दिले व तो वानप्रस्थ स्वीकारून वनात गेला.

२७. भर्तरी आणि पिंगला

शुभविक्रमाचा मंत्री सुमंत याने आपली कन्या पिंगला हिचा विवाह भर्तरीशी करून दिला. भर्तरी व पिंगला यांचे एकमेकांवर अतिशय प्रेम होते. भर्तरी एकदा एकांतात पिंगलेजवळ बोलत बसला असताना, मनुष्याचा स्वार्थीपणा व नि:स्वार्थी प्रेम या विषयावर चर्चा चालली होती. पिंगलेने खऱ्या प्रेमाची थोरवी सांगताना असे म्हटले, "नाथ, मी तुमच्या मांडीवर डोके टेकून झोपले आहे अशा वेळी मला मरण आले तर मी किती भाग्यवान!" भर्तरी म्हणाला, "असे का म्हणतेस?देवाच्या मनात आले तर तो तुझ्या आधी मलाच नेईल." पिंगला म्हणाली, "नाथ! असे अशुभ बोलू नका. तुमच्या मागे मी क्षणभरही जिवंत राहणार नाही!" भर्तरीला काही ते पटेना. तेव्हा ती म्हणाली, "काही झाले तरी 'विधवा' हा शब्द मी

स्वत:ला लावून घेणार नाही." भर्तरी त्यावर काहीच बोलला नाही पण तिचे शब्द मात्र त्याच्या मनात घोळत राहिले.

पुढे तो शिकारीला गेला असता, तिचे शब्द मनात येऊन त्याने असे ठरविले की आपल्या मृत्यूची खोटीच वार्ता परस्पर तिच्या कानी पडावी व ती काय करते ते पाहावे. त्याने आपल्या अत्यंत विश्वासू सेवकाला बोलावले. हरणाच्या रक्तात आपले वस्त्र भिजविले व शस्त्र आणि ते वस्त्र व काही तुटकी भूषणे त्याच्याजवळ दिली व म्हटले, "तू अत्यंत गुप्त गोष्ट केली पाहिजे. हे वस्त्र व ही शस्त्रे घेऊन नगरात जा. धावत, घाबरलेल्या अवस्थेत राजवाड्यात जा आणि राजाला वाघाने खाल्ले असा आक्रोश कर. पिंगलेला कळू दे. माझे वस्त्र, खड्‌ग, तुटकी भूषणे दाखव. मोठा शोक कर. नाटक चांगले वठव. जो परिणाम होईल त्याबद्दल तुला दोष नाही."

सेवकाने ते मान्य केले. शिकारीला आलेल्या कोणालाही न कळू देता तो सेवक मागे मागे राहिला व एकदम परत फिरून नगरात गेला. राजा इतरानांही फसवून वनात दूर लपून बसला. संध्याकाळपर्यंत शिकारीत गढलेले लोक एकत्र जमले तेव्हा तो त्यांच्यात मिसळला. मग मारलेली सावजे घेऊन सर्वजण नगराकडे परतले.

पण नगरात दिवसभरात काय घडले होते? त्या सेवकाने आणलेली दुष्ट वार्ता ऐकताच पतिव्रता पिंगला जी धाडकन खाली कोसळली ती तत्काळ बेशुद्ध पडली. शुद्धीवर आल्यावर तिने अत्यंत आक्रोश केला व सेवकांना आणि सर्वांना सांगून तिने चिता रचली आणि ती सती गेली! पतीनंतर तिला जिवंत राहायचे नव्हते! तिने आपला शब्द खरा केला.

सायंकाळी चिता पूर्ण पेटून सती दग्ध झाली व लोक रडत रडत घरोघर चालले होते तोच त्यांना भर्तरी व अनेक लोक शिकार करून परत येताना दिसले! लोकांच्या आश्चर्याला पारावार राहिला नाही.

भर्तरीपुढे येऊन जास्त निकटवर्ती लोकांनी त्याला पिंगला सती कशी गेली ते सांगितले! भर्तरीने हाय खाल्ली. तो वेडाच झाला. स्मशानाकडे धावला. चितेत उडी घालणार तो लोकांनी त्याला मागे ओढले व घट्ट पकडून ठेवले! भर्तरीने पत्नीची प्रतिज्ञा हसण्यावारी नेली. थट्टा केली, क्रूर थट्टा केली. काय करायला गेला आणि काय झाले! तोही चितेत उडी मारणार होता तेव्हां लोकांना वाटले की आता आपण खरेच पोरके होणार! मोठ्या प्रयासाने त्यांनी भर्तरीला अडविले व सांत्वन केले. शुभविक्रम, सुमंत, विक्रम हे मथुरा नगरीत गेलेले होते. त्यांना बोलावून घेण्यात आले. त्यांनीही भर्तरीचे सांत्वन केले. पण त्याचे मन कशातच लागेना. तो फारच विषण्ण झाला. तो स्मशानातच जाऊन बसला. तो कोणाजवळ काहीही बोलेना. पिंगला, पिंगला असे नुसते पुटपुटत बसे. शून्य नेत्रांनी शून्यपणे आकाशाकडे पाही. चितेतली रक्षा हातात घेऊन एकदम रडू लागे. भूक लागली की फार तर झाडाचा पाला खाई. त्याला परत नगरात नेण्याचे सर्व उपाय थकले. पण असे हे सगळे का घडून आले? कारण वेगळेच होते. भर्तरी विरक्त व्हावा यासाठी दत्तात्रेय व सूर्य यांनी काही बेत मनाशी ठरवूनच भर्तरीवर हा दु:खाचा प्रसंग आणला होता, कारण आपल्या अंशापासून झालेला भर्तरी संसारात अडकून भोगासक्त होऊन राहावा हे त्यांना आवडत नव्हते.

२८. विरक्ती की आसक्ती?

गोरक्षनाथाने मच्छिंद्रनाथाचा निरोप घेतला व तीर्थयात्रा करीत करीत तो गिरनार पर्वतावर गेला. तेथे दत्तात्रेयांची व त्यांची भेट

झाली. दत्तात्रेयानी त्याच्याजवळ सर्व कुशल विचारले व म्हटले, "भर्तरी हा माझा शिष्य आहे. त्याची पत्नी पिंगला मरण पावल्यापासून तो गेली बारा वर्षे स्मशानातच शोक करीत बसला आहे. त्याने मला वचन दिले आहे की वैभव भोगून झाल्यावर तो नाथपंथ स्वीकारणार आहे. बारा वर्षे झाली. आता त्याला मोहातून सोडवून दीक्षा दिली पाहिजे. द्रुमिल नारायणाचा तो अवतार आहे." दत्तांनी गोरक्षाला भर्तरीची सर्व कथा सांगितली व अवंती नगरीला जाण्यास सांगितले.

गोरक्ष सिद्धींच्या साहाय्याने अवंती नगरीजवळ स्मशानात अगदी थोड्या वेळातच पोहोचला. तेथे भर्तरी शून्य मनाने बसला होता. 'एका स्त्रीसाठी वेडा होऊन हा असा अस्थिपंजर झाला आहे, याला ताळ्यावर कसा आणावा' याचा गोरक्षाने खूप विचार केला व त्याला एक युक्ती सुचली.

गोरक्ष गावात गेला. त्याने कुंभाराकडून एक मातीची बाहुली करून घेतली. नाक, डोळे, तोंड वगैरे त्यावर रंगाने रेखाटून ती बाहुली घेऊन तो परत स्मशानात गेला. भर्तरीच्या जवळून तो मुद्दाम चालत गेला व ठेच लागल्याचा बहाणा करून धाडकन पडला. ती बाहुली पडली व फुटली. झाले! गोरक्ष त्या बाहुलीचे तुकडे गोळा करून 'माझी लाडकी बाहुली गेली हो!' इत्यादी प्रकारे खूपच आक्रोश करू लागला!

भर्तरीचे त्याकडे लक्ष गेले व क्षणभर आपले दु:ख विसरून तो गोरक्षाचे सांत्वन करू लागला. "अरे गोसाव्या! ती मातीची बाहुली फुटली म्हणून काय रडतोस? मडके ते, केव्हातरी फुटणारच! गावात जा नि दुसरी आण!"

त्यावर गोरक्ष म्हणाला, "मी थोडा वेळच रडतोय, पण तू तर बारा वर्षे रडतो आहेस! त्याचे काय?"

भर्तरी म्हणाला, "मी हाडामासांच्या पत्नीसाठी, पिंगलेसाठी रडतो. तू त्या बाहुलीसाठी रडतोस, अरे अशा कित्येक बाहुल्या मिळतील!" गोरक्ष म्हणाला, "तुझी पत्नी तरी काय? मायेची पुतळी! अरे! अशा हजारो पिंगला मी तुला भेटवितो!" असे म्हणून गोरक्षाने रक्षेवर मंत्राचा प्रयोग केला आणि भर्तरीसमोर त्याची पत्नी पिंगला प्रकट झाली आणि तिच्याभोवती आणखी कितीतरी पिंगला प्रकट झाल्या. भर्तरी चकित झाला. सर्व पिंगलांसह मुख्य राणी भर्तरीजवळ आली. ती म्हणाली, "नाथ! संसार असार आहे. मी अग्नीत उडी घेतली पण तुम्ही माझ्या देहासाठी का रडत बसलात? तुम्ही सर्व संग सोडावा व दत्तात्रेयांनी दिलेला अनुग्रह आठवून नाथपंथ स्वीकारावा, जगाच्या उद्धारासाठी आयुष्य खर्च करावे."

भर्तरीचे डोळेच उघडले! गोरक्षाचे योगसामर्थ्य आपल्या सर्व वैभवापेक्षा फारच श्रेष्ठ आहे हे त्याच्या लक्षात आले. पिंगलेला अदृश्य करायला त्याने गोरक्षाला सांगितले. आता त्याला कसलाच मोह उरला नव्हता. गोरक्षाजवळ त्याने आपले मन उघड केले. "पिंगला भेटवलीस तर मी सारे राज्य तुला देतो" असे त्याने कबूल केले होते. तो राज्यत्याग करून नाथपंथात जायला निघाला. मग गोरक्ष त्याला हळूहळू अवंती नगरात घेऊन गेला. विक्रमाने सर्व वृत्त समजून घेऊन गोरक्षाला व भर्तरीला सहा महिने अवंती येथे राहण्याचा आग्रह केला. पण ते तयार झाले नाहीत. भर्तरीची परीक्षा पाहण्यासाठी गोरक्षाने त्याला कंथा, झोळी आदी देऊन प्रथम त्याच्या शेकडो बायकांजवळ भिक्षा मागायला सांगितले. तसा तो गेला. त्याच्या बायकांनी एकच आक्रोश केला. त्या त्याला सोडायला तयार होईनात. पण भर्तरीने निर्धाराने सर्वांचा त्याग केला आणि गोरक्षाबरोबर तो निघून गेला.

भर्तरी अशक्त झाला होता, त्याची शक्ती भरून येण्यासाठी गोरक्षाने शक्तिमंत्राने त्याच्या कपाळावर भस्म लावले. भर्तरीला

उत्साह वाटू लागला. गोरक्ष त्याला घेऊन गिरनार पर्वतावर गेला. त्यांची दत्तात्रेयांनी भेट घेतली. भर्तरीला दत्तांनी प्रेमाने कुरवाळले तेव्हा भर्तरीचा जणू पुनर्जन्म झाला. विद्याभ्यासासाठी दत्तांनी त्याला ठेवून घेतले.

२९. चौरंगीनाथाचे जन्मरहस्य

दत्तांनी सांगितल्यावरून गोरक्ष गर्भाद्रि पर्वतावरील मच्छिंद्रनाथांना भेटून त्यांना गिरनार पर्वतावर दत्तभेटीसाठी आणायला गेला. ते दोघे परत येत असता वाटेत कौंडिण्यपूर नगरात आले. तेथील शशांगर नावाच्या राजाने आपला पुत्र कृष्णागर यावर रागावून त्याचे हातपाय तोडले होते व त्याला एका चौरंगावर एका चौकात त्याच अवस्थेत टाकून दिले होते. तेथे त्या दोघांनी लोकांजवळ "हा काय प्रकार आहे?" अशी चौकशी केली तेव्हा त्यांना आश्चर्यकारक माहिती मिळाली.

हा शशांगर राजा पुत्रप्राप्तीसाठी रामेश्वरास जाऊन शिवाची आराधना करावी म्हणून आपली स्त्री मंदाकिनी हिच्यासह दक्षिणेस चालला होता. वाटेत कृष्णा व तुंगभद्रा नद्यांच्या संगमावर एका गावी तो राहिला होता. तेथे स्वप्नात त्याला शंकराने दर्शन देऊन 'संगमावरील शिवलिंगाची आराधना कर म्हणजे तुला पुत्रप्राप्ती होईल' असा वर दिला. त्याने नंतर संगमाजवळ असलेल्या पुरातन मंदिरातील शिवलिंग शोधून काढले व त्या देवळाचा जीर्णोद्धार करून प्राणप्रतिष्ठा करून त्या शिवलिंगाची आराधना, अर्चना करण्यास प्रारंभ केला. त्या स्थानाला महत्त्व आले. लोक त्या

स्थानाला संगमेश्वर म्हणू लागले. शशांगर राजा नदीत स्नानसंध्यादी करून संगमेश्वरावर अभिषेक करी.

स्वर्गात सुरोचना नावाची अप्सरा नृत्य करताना शंकराकडे तिचे मन गेले व ती नृत्य करताना चुकली म्हणून शंकराने तिला मृत्युलोकात त्या संगमाजवळच्या ग्रामात राहणाऱ्या मित्राचार्य व शरयू या ब्राह्मण दांपत्याच्या पोटी कन्या रूपाने जन्म घेण्याची शिक्षा केली. तिने उ:शाप मागितला तेव्हा ते म्हणाले, "मी प्रत्यक्ष तुला दर्शन देऊन स्पर्श करीन त्यामुळे तुझी मनुष्यलोकातून सुटका होऊन तू अप्सरा होशील." ती अप्सरा 'कदंबा' नावाची त्या मित्राचार्यांची कन्या झाली. ती मोठी झाली तरी तिला लग्नाचा विचार न सुचता नेहमी ती शंकराचीच आराधना करी. ती एकदा मंदिरात गेली असतां शंकर दिव्य रूपात प्रकट झाले आणि ती घाबरली. बाहेर पडली. नदीतीराने धावत घरी निघाली. तोच शंकराने तिला गाठले व तिला स्पर्श केला. तेव्हा कदंबा अदृश्य झाली आणि अप्सरा प्रगट होऊन स्वर्गात निघून गेली. शंकराच्या दिव्य शरीरातून तेज द्रवरूप होऊन नदीत पडले. नदीच्या पात्रात उभा राहून ओंजळीत पाणी घेत असलेला शशांगर राजा अर्ध्य देणार होता. त्याच्या ओंजळीत ते द्रव्य पाण्याबरोबर आले. मानवी देहाचा स्पर्श होताच त्या तेजापासून तत्काळ एका दिव्य बालकाचा जन्म झाला! शंकराने दृष्टांत देऊन पुत्र होण्याचा वर दिला होता तोच हा पुत्र होय असे शशांगर राजाने ओळखले. त्याने मंदिरात जाऊन शिवासमोर तो बालक ठेवला, घरी नेऊन राणी मंदाकिनीच्या हाती देऊन तिला सर्व प्रकार सांगितला. दोघे कृतार्थ झाली! 'कृष्णा' नदीतून उत्पन्न झाला म्हणून त्याचे नाव 'कृष्णागर' असे त्यांनी ठेवले. हाच पुढे चौरंगीनाथ म्हणून प्रख्यात झाला. तो कसा?

३०. स्त्रियश्चरित्रम्!

शशांगर राजा व मंदाकिनी कौंडिण्यपुरात परत आली. पुढे मंदाकिनी मरण पावली. कृष्णागर सतरा वर्षांचा झाला होता. त्याच्यासाठी अनेक मुलींच्या पत्रिका पाहण्यात येत होत्या. पण एकही पत्रिका जमत नव्हती. राजाच्या मनात स्वत:च्याच दुसऱ्या लग्नाचा विचार आला. मग स्वत:च्या पत्रिकेशी राजा भुजध्वज याची कन्या भुजावती हिची पत्रिका जमते असे पाहून, राजाने स्वत:च द्वितीय विवाह केला. कृष्णागर तरुण व सुंदर होता. राजाचा विवाह झाल्यावर कृष्णागराची सावत्र माता म्हणून भुजावती राजप्रासादात आली. तिला कृष्णागराने एकदाच पाहिले होते. पण तिने त्याला पाहिले नव्हते. हाच कृष्णागर, नात्याने आपला मुलगा आहे हे काही तिला माहीत नव्हते.

राजा शिकारीला गेला असताना एकदा कृष्णागर मोकळ्या मैदानात खेळत होता. भुजावतीने त्याला पाहिले. त्याच क्षणी तिचे मन त्याच्याकडे आकृष्ट झाले. विश्वासातील दासीला सांगून तिने त्याला आपल्या महालात बोलाविले. कृष्णागर तिला आई म्हणून ओळखत होता. पण ती त्याला ओळखत नव्हती. एकांतात तिने त्याला परका तरुण समजून प्रेमयाचना केली. तो थक्क झाला व "आई! हे पाप आहे! धिक्कार असो तुला!" असे म्हणून तिला धिक्कारून तडक बाहेर निघून गेला.

आपली केवढी चूक झाली! कृष्णागर जर हे राजाला सांगेल तर राजा आपल्याला मारून टाकील अशा भयाने भुजावतीने जीव देण्याचा विचार केला. पण दासीने तिला यातून सुटण्याची भयंकर युक्ती सांगितली. दासीने सांगितलेल्या युक्तीप्रमाणे मग भुजावतीने राजा शिकारीनंतर परत आल्यावर उलटा कांगावा केला की, "तरुण

कृष्णागराने, राजा नगरात नसताना वेळ साधून आपल्या महालात घुसून आपल्याशी अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केला." राजाला ते खरे वाटले कारण भुजावतीने नाटकच हुबेहूब वठविले होते. राजाने संतापून नोकरांना कृष्णागराला पकडून त्याचे हातपाय तोडण्याची आज्ञा केली. नोकर काकू करू लागले. तेव्हा राजाने त्यांनाच मारण्याची धमकी दिली. तेव्हा घाबरून त्यांनी कृष्णागराचे हातपाय तोडले. "त्याला चौरंगावर बांधा आणि चौकात उघड्यावर टाका" अशी आज्ञा राजाने दिली.

राजाज्ञा पाळली गेली. कोणताही अपराध नसता कृष्णागर चौकात, चौरंगावर बांधलेल्या अवस्थेत, हस्तपादविहीन असा वेदनांनी विव्हळत पडला होता. त्याच्याबद्दल लोक नाना तऱ्हेने तर्क करून बोलू लागले, कोणी हळहळू लागले. खरे कारण कोणालाही कळले नाही.

मच्छिंद्र व गोरक्ष यांना कृष्णागर दिसला तो याच अवस्थेत. त्यांनी ओळखले की हाच चौरंगीनाथ म्हणून पुढे नाथपंथी सिद्ध होईल. मग आपण राजा व भुजावती यांना चांगली अद्दल घडवू. कारण त्यांना अंतर्ज्ञानाने भुजावतीचे कपट व राजाचा आततायीपणा कळला होता.

३१. कृष्णागर नाथांच्या आश्रयाला

चौकातून दोघे नाथ मोठ्या गंभीर मुद्रा करून राजाकडे गेले. मच्छिंद्र व गोरक्ष यांची कीर्ती राजाच्या कानी पूर्वीच आली होती. त्याने त्यांचे चांगले स्वागत केले आणि 'काय सेवा करू' असे विचारले. मच्छिंद्राने कृष्णागराचा विषय काढला व म्हटले, "राजा,

चौकात जो मुलगा असा टाकून दिला आहेस तो तू आम्हाला दे." राजाने थोडे आढेवेढे घेतले, पण तो मुलगा दृष्टीआड झाला तर बरेच होईल या विचाराने त्याने संमती दिली.

नाथांनी चौरंगावरील त्या विकलांग कृष्णागराला सोडवून आपल्याबरोबर नगरापासून दूर नेले. गोरक्षाने त्याच्या हातापायांवर वनस्पतींची औषधी पाने व लेप लावले. त्याला स्वहस्ते भरविले – कृष्णागराचे हृदय भरून आले. त्याची सेवा दोन्ही नाथांनी अशी केली की, त्यामुळे त्याला बरे वाटू लागले.

३२. चौरंगीचा योगाभ्यास

कृष्णागराला नाथांनी चौरंगी असे नाव ठेवले. चौरंगीची त्यांनी चांगली शुश्रूषा केली. नाथांचे प्रेमळ वागणे व त्यांच्या योगसिद्धींचा अनुभव येऊन चौरंगीला खूप बरे वाटले. आपले हातपाय पुन्हा येतील का अशी आशा त्याच्या मनात उत्पन्न झाली. नाथांनी त्याला बदरिकाश्रमाजवळ एका गुहेत ठेवले. त्या गुहेवर त्यांनी एक शिळा ठेवली. चौरंगीला त्यांनी सांगितले, "तू या शिळेवर दृष्टी स्थिर ठेव. हलू नको. एक मंत्र सांगतो तो म्हणत राहा. त्याचा अर्थ समजून त्याचा जप कर. तुला बसल्या जागीच खायला मिळेल अशी व्यवस्था मी करून जातो. शिळेवरील दृष्टी ढळेल तर शिळा डोक्यात पडेल!" गोरक्षाने अशा प्रकारे सांगून शिळा ठेवली. मग चामुंडेला सांगितले की रोज चौरंगीला खाण्यासाठी गुहेत त्याच्यासमोर फळे आणून ठेव." नंतर ते दोघे गिरनार पर्वतावर गेले व दत्तात्रेयांना भेटले.

गुहेत चामुंडा फळे ठेवी पण चौरंगीला हातच नव्हते. खाली वाकून तोंडाने फळे खावीत तर शिळेवरील दृष्टी ढळणार व कपाळमोक्ष होणार या भीतीने तो उपाशीच राहिला. त्याने चित्त जराही विचलित न होऊ देता जप चालू ठेवला. तो कालांतराने क्षीण झाला. त्याच्या शरीराभोवती वारूळ तयार झाले. अगदी स्थिर राहून चौरंगी जप व अनुसंधान करीत राहिला. त्याची अशी खडतर तपश्चर्या चालली होती. कितीतरी काळ गेला. तोपर्यंत मच्छिंद्र व गोरक्ष कोठे फिरत होते?

३३. मच्छिंद्राचा परकाया प्रवेश

गिरनार पर्वतावर सहा महिने राहून मच्छिंद्र व गोरक्ष तीर्थयात्रा करीत निघाले. उत्तरेकडे प्रवास करीत ते काशीनगरीत पोहोचले. त्यावेळी काशीनगरीवर दुर्धर प्रसंग ओढवलेला होता. तेथील राजा त्रिविक्रम मरण पावला होता – अगदी तरुण, न्यायी, प्रजापालक राजा! प्रजा अत्यंत दु:ख करीत होती. राणी रेवती शोक करीत होती. गोरक्षाला दया आली. राजाला पुन्हा जिवंत करावे म्हणून तो मंत्र म्हणू लागला. पण त्याचा उपयोग होईना. तेव्हा मच्छिंद्राने राजाच्या मृतदेहात स्वत: प्रवेश केला. आपला देह शिवमंदिरात सुरक्षित ठेवण्याची व्यवस्था करण्यास त्याने गोरक्षाला सांगितले. गोरक्षाने तेथील पुजारिणीला सर्व सांगून एका तळघरात तो देह जपून ठेवला. बारा वर्षांनी मच्छिंद्र परत त्या देहात येणार होता. तोवर तो देह राखून ठेवायचे तिने मान्य केले.

राजा जिवंत झाला. तो मच्छिंद्र हे कोणालाही कळले नव्हते. राजाच्या रूपात तो येऊन गुप्तपणे आपला देह बघून जाई. काही

दिवसांनी गोरक्ष तीर्थयात्रेला निघून गेला. बारा वर्षे त्याच देवळात राहण्यात धोका होता. राजाला पुत्र झाला. धर्मनाथ असे त्याचे नाव ठेवले. पुढे एकदा राणी शंकराच्या मंदिरात आली असतां तिला पुजारिणीकडून कळले की त्रिविक्रम राजा मेला असून मच्छिंद्राने त्याच्या देहात प्रवेश केला आहे. मच्छिंद्राचा देहही तिने तळघरात जाऊन पाहिला. राणीला फार वाईट वाटले. आता पाच वर्षे झाली होती. आणखी सात वर्षे होती. नंतर योगी देहात परत येणार. त्याला येता आले नाही तर? आपण या देहाचा नाश केला की बस्स!

तिने पुजारीण नसताना सेवकांना सांगून त्या देहाचे तिळाएवढे तुकडे करवून अरण्यात सर्वत्र टाकले. हेतू हा की मच्छिंद्राला देहच मिळू नये.

मच्छिंद्राची ही दुर्गती पार्वतीने पाहिली व शंकरांना सांगितली. मग त्यांनी ते सर्व कण यक्षिणींकडून जमवून वीरभद्राच्या हाताखाली कडेकोट संरक्षणात ठेवले. मच्छिंद्राने पूर्वी वीरभद्र व यक्षिणी यांचा पराभव केला होता. त्याचे उट्टे काढावे असा वीरभद्राचा बेत होता. गोरक्षाला कळले की तो लढायला येईल, मग आपण त्याचा पराभव करू असे त्याने ठरविले होते.

इकडे गोरक्ष पुजारिणीला शपथ घालून सात वर्षांसाठी तीर्थयात्रेला निघाला, त्याने काय केले?

३४. 'माणिक'चा अडबंगनाथ झाला!

तीर्थयात्रा करीत असता गोरक्ष गोदावरी नदीच्या प्रदेशात गेला. तेथे एका शेतात माणिक नावाचा शेतकरी दुपारची न्याहारी करीत बसला होता. गोरक्षाला भूक लागली होती. माणिकने आपल्यातली

भाकरी त्याला दिली. पाणी दिले. गोरक्ष तृप्त झाला. 'तुझी काय इच्छा पूर्ण करू?' असे त्याने माणिकला विचारले. माणिक म्हणाला, "मला काही नको. तुलाच दुपारच्या भाकरीची भ्रांती! तू मला काय देणार?" गोरक्षाने ओळखले होते की हा मुलगा मोठा योगी, नाथपंथी होऊ शकेल. त्याने म्हटले, "मला सिद्धीच्या जोरावर काहीही मिळवता येते." "पण मग तू भिक्षा का मागतोस? अरे गोसाव्या, तू जर काही मागशील तर मीच ते तुला देईन." गोरक्ष म्हणाला, "वचन दे." माणिकने वचन दिले. तेव्हा गोरक्ष म्हणाला, "तुझा संकल्प मला दे. तुला जे जे करावे असे वाटेल ते तू करू नको." "ठीक आहे. मी तुझ्या सांगण्याप्रमाणे करतो," माणिक म्हणाला. त्यावेळी माणिकचे सर्वच संकल्प मावळले. तो होता तसाच उभा राहिला. कितीतरी वर्षे तो तिथेच राहिला. अगदी अस्थिपंजर झाला. पुढे जेव्हा गोरक्ष तीर्थयात्रेहून परत आला तेव्हा मच्छिंद्र व चौरंगी त्याच्याबरोबर होते. त्यांची गोष्ट पुढे येईलच. माणिकचे काय झाले ते आधी पाहू. गोरक्षाने त्याला दीक्षा दिली व त्याचे नाव 'अडबंग' असे ठेवले. माणिकला प्रथम उभाच्या उभा ठेवून आधी गोरक्ष तीर्थयात्रेला पुढे गेला त्याची गोष्ट आता पाहू या.

३५. चौरंगी, शशांगर, मच्छिंद्र व धर्मनाथ

गोरक्ष बदरिकाश्रमात गेला. तेथे एका गुहेत चौरंगीनाथ अर्थात् कृष्णागर, हातपाय तोडलेल्या अवस्थेत ध्यानस्थ बसलेला होता. शिळेवर दृष्टी स्थिर करून तो कितीतरी काळ तसाच पूर्ण उपाशी होता. गोरक्षाने शिळा बाजूला केली. आत पाहिले. तेथे तर वारूळ झाले होते. ते त्याने बाजूला केले. चौरंगी तसाच ध्यानस्थ बसला

होता पण त्याला नवीन हातपाय आले होते. तो अस्थिपंजर झाला होता. त्याला गोरक्षाने सावध केले व अमृतदृष्टीने त्याच्याकडे पाहिले. चौरंगी पुन्हा सशक्त व्हावा म्हणून गोरक्षाने त्याला शंकराकडे नेले. शंकरांनी त्याला पुन्हा सशक्त केले व सहा महिने बदरिकाश्रमात राहून त्याने सर्व विद्या शिकून घेतल्या. नंतर गोरक्ष त्याला घेऊन कौंडिण्यपुरास शशांगर राजाला शिक्षा करण्यासाठी गेला.

नगराजवळ गेल्यावर गोरक्षाच्या सांगण्यावरून चौरंगीने अस्त्रांचा प्रयोग करून राजोद्यानात हलकल्लोळ उडवून दिला. दोन योगी नगरात आले आहेत त्यांचा हा प्रताप असणार असे वृत्त कळताच राजा त्यांना भेटण्यास आला पण अस्त्रप्रयोगाने नाथांनी राजाला आकाशात उडविले व शरण आणले. कृष्णागर राजाला भेटला. गोरक्षाने मुलाचा कायाकल्प केला म्हणून राजा त्याच्या पाया पडला. भुजावतीने कसा घात केला हे कळताच राजाने तिला मार देऊन हद्दपार केले! शशांगर राजाला आता फारच पश्चात्ताप झाला होता. त्याला गोरक्षाने पुन्हा तारुण्य दिले. 'दुसरे लग्न करून सुखी हो' असा आशीर्वाद देऊन गोरक्ष चौरंगीसह तेथून निघाला तो काशी नगरीत शिवालयात गेला.

पुजारिणीला भेटून ते तळघरात गेले तो मच्छिंद्राचा देह तिथे नव्हता. पुजारीण घाबरली. तिने राणीचे नाव घेतले. ती गुप्तपणे राणीकडे गेली व 'बारा वर्षे संपत आली' असे म्हणाली. तेव्हा राणीने तिला विश्वासात घेऊन, 'मच्छिंद्राच्या देहाचे कणकण तुकडे करून अरण्यात कसे टाकले' ते सांगितले. पुजारीण तेथून गोरक्षाकडे आली व तिने त्याला हा प्रकार सांगितला. गोरक्षाने राणीला शासन करण्याचा विचार न करतां मच्छिंद्राच्या देहाचा शोध घ्यायचे ठरविले.

गोरक्षाने सूक्ष्म देहाने त्रिलोकात प्रवास करून धुंडाळले पण मच्छिंद्राच्या शरीराचा शोध लागला नाही. शेवटी तो कैलासात

गेला. तेथे मच्छिंद्राच्या देहाचे कण एकत्र करून ठेवलेले त्याला दिसले. तो तत्काळ भूलोकात आपल्या देहात शिरला. जागृत होऊन चौरंगीसह तेथून निघाला. त्याने सूर्याला मध्यस्थी करून वीरभद्राकडून तो देह मिळविण्याचा प्रयत्न केला पण वीरभद्राने त्याचे ऐकले नाही.

वीरभद्राने अष्टभैरवांना गोरक्षाशी लढायला भूलोकात पाठविले. गोरक्षाने व चौरंगीने वीरभद्राच्या सर्व बळाचा पराभव केला. विष्णूने वीरभद्राला सांगितले – "गोरक्षाला मच्छिंद्राचा देह देऊन टाका. मच्छिंद्राची ईश्वरी कार्यासाठी फार आवश्यकता आहे. त्याने पूर्वी तुझा पराभव केला होता म्हणून तू त्याचा सूड घेऊ नको." तेव्हा मच्छिंद्राचा देह वीरभद्राने भूलोकात आणून दिला. गोरक्षाने दैत्यास्त्र योजून हा प्रताप केला होता, आता अग्निअस्त्र योजून त्यांचे व वीरभद्राचेही त्याने भस्म केले! पण मग आपली चूक लक्षात घेऊन गोरक्षाने शंकराची क्षमा मागितली आणि वीरभद्राच्या अस्थीवर संजीवनीमंत्र योजून त्याला पुन्हा जिवंत केले. वीरभद्राचे व गोरक्षाचे सख्य शंकरांनी घडवून आणले.

नंतर योग्य वेळ येताच त्रिविक्रमाच्या देहातून मच्छिंद्राने योगबळाने आपल्या पुन्हा घटित केलेल्या देहामध्ये प्रवेश केला. त्रिविक्रमाच्या देहावर अग्निसंस्कार करण्यात आले. त्रिविक्रमाचा पुत्र धर्मनाथ याला रेवतीने सत्य प्रकार काय तो सांगितला. धर्मनाथाला राज्य देऊन आणि बारा वर्षांनी परत येऊन भेटू असे आश्वासन देऊन तिघे योगी पुढे तीर्थयात्रेला गेले.

गोदावरी तीरावर एका शेतात 'माणिक' अजून उभाच होता. गोरक्षनाथाने त्याची व मच्छिंद्राची भेट घडविली. माणिकला साधनेतून मुक्त केले. नाथपंथाची दीक्षा दिली. कानमंत्र दिला. माणिकला तत्काळ साक्षात्कार झाला. शक्तिमंत्राने त्याला गोरक्षाने

शक्ती दिली. अडबंगनाथ असे त्याचे नाव ठेवले. त्याला सर्व विद्या शिकविल्या. तोही सिद्ध झाला.

बारा वर्षांनी ते योगी परत काशी क्षेत्रात आले. धर्मनाथाची भेट घेतली. त्याचे मन राज्यकारभारात नव्हते. त्याला दीक्षा हवी होती. त्याने आपल्या मुलाला राज्यावर बसविले व दीक्षा घेतली. तोही नाथांबरोबर यात्रेला निघाला. अशाप्रकारे मच्छिंद्र, गोरक्ष, चौरंगी, अडबंग व धर्मनाथ तीर्थे पाहात, देशोदेशी लोकांना योगमार्ग व मोक्षमार्ग यांची शिकवण देत भ्रमण करू लागले.

३६. रेवणनाथाची गोष्ट

ब्रह्मदेवाचे तेज उत्पन्न होऊन ८८ हजार ऋषी उत्पन्न झाले त्यातीलच एका अंशाने रेवा नदीच्या काठी चमस नारायणाने मानवी शरीर धारण केले. तो बालक एका कुणब्याला सापडला आणि त्याने त्याला घरी नेले व वाढविले, त्याचे रेवण असे नाव ठेवले. रेवण मोठा झाला व कुणब्याच्या कामात मदत करू लागला. एकदा पहाटे उठून रेवण बैल चारावयाला रानात जात होता. चांदणी रात्र होती. त्यावेळी दत्तात्रेय वेगाने त्याच मार्गाने जात होते. त्यांचा या रेवणाला धक्का लागला. त्या स्पर्शाने आपल्या 'चमस' नावाचे त्याला स्मरण झाले, दत्तांची ओळख पटली. तो त्यांना शरण गेला व अनुग्रह मागितला. दत्तांनी त्याच्यावर कृपा करून त्याचे समाधान केले. त्याला एक सहस्त्रांश सिद्धी दिली. पूर्ण सिद्ध केले नाही कारण त्याचा अधिकार वाढणे आवश्यक होते. दत्त निघून गेले. रेवणाने अल्प सिद्धींची प्रचिती घेतली. महिमासिद्धीने त्याला मातीचे सोने करून दाखविले, संकल्पानेच अन्न निर्माण करून दाखविले, पण

सिद्धी देवतेने त्याला प्रत्यक्ष दर्शन दिले नाही. त्याने मग त्या कुणब्याच्या घरी भरपूर वैभव दिले. सिद्धान्नाने तो गावातल्या लोकाना पोटभर जेवायला घालू लागला. लोकांचे दारिद्र्य फिटले. त्याला रेवणसिद्ध हे नाव पडले. मच्छिंद्राच्या कानी त्याची कीर्ती आली. त्याने गावात येऊन रेवणाला, आपल्या सिद्धींच्या बळाने पशुपक्ष्यांजवळ बोलणे, खेळणे, त्यांना जेवू घालणे व त्यांना आज्ञा देऊन पाठविणे असे चमत्कार दाखविले. रेवणाने महिमासिद्धीजवळ तशी शक्ती मागितली तेव्हा तिने सांगितले – "दत्तांना शरण जा. तेच फक्त अद्वैताचा बोध देतील आणि महासिद्धी देतील." तेव्हा रेवण पुन्हा शेतात जाऊन तप करू लागला. तो कृश झाला. मच्छिंद्राने त्याची स्थिती पाहून दत्तांची भेट घेतली आणि रेवणावर खरोखरी कृपा करा अशी प्रार्थना केली. तेव्हा दत्तांनी रेवणाला जवळ घेतले, ब्रह्मज्ञानी व वज्रदेही केले. गिरनार पर्वतावर त्याला योगाभ्यास शिकविला व तीर्थयात्रेला जाण्याची आज्ञा दिली.

रेवण माणदेशात विटे या गावी सरस्वती नावाच्या ब्राह्मणाच्या घरी गेला असता त्या दिवशी त्या ब्राह्मणाच्या मुलाचे बारसे होते. त्या ब्राह्मणाची पहिली सहा मुले अर्भकावस्थेतच मेली होती, आणि हा सातवा मुलगाही आजारी होऊन रात्री मरण पावला. रेवणाला ते सकाळी कळले. त्याने तीन दिवस प्रेत जपून ठेवण्यास सांगून योगशक्तीने यमाकडे जाऊन मृत पुत्रांना परत पाठविण्यास सांगितले. यमाला कर्मनियम मोडतां येईना. त्याने रेवणाला शंकरांकडे जाण्यास सांगितले. रेवण कैलासाला गेला व शंकराशी त्याने युद्ध केले. त्यावेळी विष्णूने रेवणाला येऊन सांगितले, "तुला हवेत ते ब्राह्मणपुत्र जीवात्मारूपात मजकडे आहेत. ते जीवात्मे तुला देतो पण त्यांसाठी देह निर्माण करण्याचे कार्य तू कर."

रेवण जीवात्म्यांना घेऊन सरस्वती ब्राह्मणाच्या घरी आला व सातव्या मुलाच्या देहाचे सात भाग करून त्याने त्यांत साती

जीवात्मे प्रविष्ट केले. त्यांना सारंगीनाथ, जोगीबानाथ इत्यादी नावे दिली. विटे गावी रेवणनाथ अनेक वर्षे राहिला व तेथेच त्याने समाधी घेतली.

३७. वटसिद्ध नागनाथाची गोष्ट

ब्रह्मदेवाचे तेज सरस्वतीच्या आकर्षणाने उत्पन्न झाले ते भूलोकात एका वटवृक्षाच्या ढोलीत एका सर्पिणीच्या मुखांत पडले. ते तिच्या पोटात गेले. तेथे आविर्होत्र ऋषीने आपले चैतन्य प्रविष्ट केले. त्यामुळे त्या सर्पिणीला मानवी बालक झाला. त्यानंतर ती निघून गेली. ढोलीत तो बालक रडत होता. तेथे कोशधर्म नावाचा ब्राह्मण वडाची पाने काढायला आला होता. बाळ रडत आहे असे पाहून वडाच्या ढोलीतून त्याने बाळाला उचलून घेतले, तोच आकाशवाणी झाली – "हा बालक तू सांभाळ. तुझे कल्याण होईल. हा सिद्ध आहे, वटसिद्ध नागनाथ या नावाने हा प्रख्यात होईल." त्याने त्या मुलाला सांभाळले. सातव्या वर्षी त्याची मुंज केली. पुढे तो मुलांबरोबर काशीत शंकरमंदिराजवळ 'लटोपटीच्या मेजवानी'चा खेळ खेळत होता. दत्तांनी ते पाहिले व नवनाथांपैकी हा एक आहे हे ओळखले. त्यांनी वटसिद्धावर कृपा केली व त्याला हवे ते अन्न निर्माण करण्याची सिद्धी दिली. 'ते अन्न इतरांना दे पण स्वत: खाऊ नको' असेही सांगितले. तो आविर्होत्र नारायण आहे हे त्यांनी ओळखले होतेच. नंतर ते निघून गेले.

नागनाथ मुलांना रोज उत्तम भोजन देऊ लागला. त्याचा बोभाटा खूप झाला. कोशधर्माला सर्व प्रकार कळला तेव्हा वाटले, "हा अवतारी पुरुषच आहे." तो मग मुलाला म्हणाला, "तुजवर दत्तांची

कृपा झाली आहे. त्यांना तू पुन्हा भेटण्याचा प्रयत्न कर. पण ते कठीण आहे. तुला खूप शोध घ्यावा लागेल."

नागनाथ त्याच्या परवानगीने दत्तांचा शोध घ्यायला निघाला. दत्त जेथे जातात असे त्याला कळले तेथे तो गेला. दत्तगुरू कोल्हापुरात येऊन भिक्षा मागून जातात असे त्याला कळले. तेव्हा नागनाथाने तेथे गावभोजने घालण्याचे ठरविले. गावात कोणीही घरी जेवला नाही म्हणजे दत्त गावभोजनाच्या ठिकाणी येतील व आपण त्यांना भेटू असे त्याला वाटले. त्याने देवीच्या पुजाऱ्याला सांगून 'देवळात सर्व गावाला भोजन आहे' अशी दवंडी पिटविली. तेवढे अन्न त्याने सिद्धींच्या सामर्थ्यावर निर्माण केले. रोज तो असे गावभोजन घालू लागला. पण दत्त कोरडी भिक्षा मागूनच जाऊ लागले. शेवटी नागनाथाने लोकांना सांगितले – "मी धान्य देतो ते घरी न्या. जो भिक्षेकरी कोरडी भिक्षाच घेतो त्याला हेच धान्य घाला पण हे धान्य नागनाथाने सिद्धींनी निर्माण केलेले आहे असे सांगा. जर त्याने ते घेतले नाही तर तो भिक्षेकरी कुठे आहे तो मला दाखवा. मला त्याची भेट घ्यायची आहे."

आणि तसेच घडले. सिद्धींनी निर्माण केलेले धान्य दत्तांनी घेतले नाही. तत्काळ लोकांनी नागनाथाला तेथे बोलावून आणले. दत्तांचे दर्शन होताच नागनाथ धावतच पुढे गेला व दत्तांच्या चरणांना मिठी मारून रडू लागला. दत्तांचा विरह त्याला वीस वर्षे झाला होता! दत्तांनी त्याचा शोक दूर केला. त्याला ज्ञानदीक्षा दिली, आत्मबोध दिला. मग दत्त त्याला कोल्हापुरातून काशीस घेऊन गेले व तेथून बदरिकाश्रमास त्यांनी त्याला शंकरांच्या भेटीसाठी नेले. शंकरांनी व दत्तांनी तेथे त्याच्याकडून बारा वर्षे तप करून घेतले. त्याला पूर्ण सिद्ध केला आणि 'लोकांचे दैन्य व पाप हरण कर' अशी आज्ञा देऊन तीर्थयात्रा व संचार करण्यास पाठविले.

३८. मच्छिंद्रनाथाची भेट

त्यानंतर दत्त गिरनार पर्वतावर गेले व नागनाथ बालेघाटात वडवळ या गावी आला. नागनाथाचे आता सातशे शिष्य होते. तो लोकांच्या अडचणी व संकटे सिद्ध-योगाने दूर करू लागला. त्याची कीर्ती ऐकून मच्छिंद्र त्याला भेटण्यासाठी आला. पण दारावरील लोकांनी 'परवानगीशिवाय नागनाथ भेटणार नाहीत' असे सांगून त्याला अडविले. तेव्हा मच्छिंद्राने नागनाथाची निंदा केली. द्वारपालांनी त्याला हाकलून लावले. तो अधिकच निंदा करू लागला. तेव्हा मोठा गलका झाला. नागनाथाचे शिष्य त्याला मारायला धावले तोच त्याने मंत्र टाकून सर्वांना जमिनीवर खिळवून ठेवले आणि सर्वांच्या थोबाडीत मारण्यास सुरुवात केली. काय गडबड आहे हे पाहण्यासाठी नागनाथ बाहेर आला. त्याने मच्छिंद्राच्या बंधनातून शिष्यांना मंत्रबळाने मुक्त केले आणि तो मच्छिंद्राशी अस्त्रयुद्ध करू लागला. कोणीही कोणाला आटोपेना. शेवटी सर्व दैवतांना पराभूत करून नागनाथाने मच्छिंद्राला सर्पास्त्राने बांधले. त्याने प्राण कासावीस होऊन मच्छिंद्र दत्तगुरूंचा धावा करू लागला. ते ऐकताच नागनाथाने युद्ध थांबवून मच्छिंद्राला मुक्त केले व विचारले, "आपण कोण आहात?" मच्छिंद्र म्हणाला, "मी दत्तांचा नाथपंथातील पहिला शिष्य मच्छिंद्र! गोरक्ष, जालंदर, भर्तरी, रेवण इत्यादी नाथ हे माझेच शिष्य आहेत." हे ऐकताच नागनाथ एकदम त्याच्या पाया पडला. नागांनी मच्छिंद्राच्या शरीरातील विष शोषून घेतले. दोघे नाथ प्रेमाने परस्परांना भेटले.

मच्छिंद्र म्हणाला, "दारावर पहारा कशाला? लोकांना भेटत का नाहीस?"

"अहो, मी ध्यानात असतानाही लोक मला त्रास देतात."

"आपला जन्मच दीनोद्धारासाठी आहे. तू लोकांना कंटाळू नकोस. सर्वांना मुक्तद्वार ठेव." मच्छिंद्र म्हणाला. नंतर तो निघून गेला.

नागनाथाने हा उपदेश ऐकला पण पुढे त्याने संजीवनी विद्येने मृत माणसे जिवंत करण्यास सुरुवात केली. त्यामुळे यमाचे काम नीट चालेना. तो विधात्याकडे गेला व "नागनाथाला हे कार्य करण्यापासून परावृत्त करा," अशी त्याने विनंती केली. विधाता मग सूक्ष्म रूपाने नागनाथाला भेटला व 'मृतांना जिवंत न करता, दु:खितांची समजूत कशी काढावी' ते त्याला सांगितले. नागनाथाने पुष्कळ वर्षे भक्तोद्धार करीत वडवळ येथे निवास केला व तेथेच समाधी घेतली.

३९. चर्पटीनाथाची गोष्ट

पार्वती विवाहाच्या वेळी ब्रह्मदेवाचे मन विचलित होऊन तेज निर्माण झाले ते त्याने जमिनीवर चिरडून पुसून टाकले. त्यातून पुढे वालखिल्य ऋषी निर्माण झाले. त्यातील तेजाचा काही अंश भागीरथीच्या प्रवाहात वाहात वाहात गवताच्या एका बेटात अडकून पडला. तेथे हरिणीच्या बीजाशी त्याचा संयोग झाला व देह धारण करण्यास पुरेसे द्रव्य मिळाले. त्यात पिप्पलायन ऋषींनी बालरूपाने अवतार घेतला. सत्यश्रवा नावाच्या ब्राह्मणाला तो बालक दिसला व त्याचवेळी आकाशातून पुष्पवृष्टी झाली व नारदाने विप्रवेषाने तेथे येऊन त्या ब्राह्मणाला म्हटले, "सत्यश्रवा, तू मोठा भाग्यवान आहेस. हा दिव्य बालक तू घरी ने व चर्पटी असे याचे नाव ठेवून याचा सांभाळ कर." विप्राचे बोलणे ऐकून ब्राह्मणाने बालकाला घरी नेले व चंद्रा नावाच्या आपल्या पत्नीजवळ देऊन सर्व वृत्तांत सांगितला.

त्यांनी मुलाला बाळगले, मुंज केली. बारा वर्षांचा तो मुलगा मोठा तेजस्वी होता.

नारदाने त्याच्यासंबंधी देवांना व दत्तात्रयांना माहिती दिली आणि देवानी दत्तांना म्हटले, "अवधूता, इतर नाथांप्रमाणेच चर्पटीलाही ज्ञान व सिद्धी देणार ना?" दत्त म्हणाले, "अनुताप झाल्याविना निवृत्तीचा अधिकार मिळत नाही. योग्य वेळ येताच चर्पटी मार्गाकडे वळेल. नारद म्हणाला, "चर्पटीच्या मनात विरक्ती उत्पन्न होईल अशी युक्ती मी करतो." असे म्हणून तो भूलोकात आला. चर्पटीच्या वयाच्याच मुलाचे रूप नारदाने घेतले. त्याने सत्यश्रव्याकडे जाऊन 'कुलंब' असे आपले नाव सांगितले व आपण अनाथ असून भिक्षुकी शिकायची आहे, घरातली कामे करीन, मला आश्रय द्या व शिकवा अशी विनंती केली. चर्पटीबरोबरीने शिकण्यासाठी त्या ब्राह्मणाने त्याला ठेवून घेतले.

नारद म्हणजे कुलंब तेथे राहिला. चर्पटी व सत्यश्रवा यांचे भांडण लागण्याची संधी तो पाहात होता. तशी संधी त्याला काही दिवसांनी मिळाली. एका गरीब यजमानाच्या घरी मिळणाऱ्या कमी दक्षिणेवरून चर्पटी त्या यजमानाशी भांडू लागला ते कुलंबाने सत्यश्रव्याला सांगितले. तेव्हा सत्यश्रव्याने यजमानाच्या देखत चर्पटीच्या कानफटात मारले. चर्पटी रागावून देवीच्या देवळात जाऊन बसला. मग नारदाने कुलंबऐवजी एका तेजस्वी विप्राचे रूप घेतले व चर्पटीवर आपला प्रभाव पाडून त्याला घर सोडून गुरू शोधण्यासाठी निघून जा असे सांगितले.

चर्पटीला ते पटले. 'कुलंब' या सोबत्याला घरून इकडे पाठवून द्या, मी घरी जाणार नाही. कुलंबला घेऊनच देशाटनाला जातो, असे तो म्हणाला. तेव्हा नारदाने जाऊन पुन्हा कुलंबरूपाने तेथे येऊन म्हटले, "चर्पटी, एका ब्राह्मणाने तू इथे आहेस असे सांगितले. मला

बोलावलेस? अरे तो ब्राह्मण निघून गेला." चर्पटीने आपला निघून जाण्याचा बेत सांगितला तेव्हा कुलंब लगेच तयार झाला.

ते देशात अनेक तीर्थक्षेत्रे पाहात हिंडले. चर्पटीला वारंवार भक्तिप्रेमाचे भरते येत होते. ते दोघे कालांतराने केदारनाथला गेले. तेथे तर चर्पटी आनंदाने केदारनाथ! केदारनाथ! म्हणत ध्यानस्थ बसला. तेव्हा नारदाने मच्छिंद्रनाथ, शंकर आणि दत्त यांना चर्पटीस दर्शन देण्याची विनंती केली. चर्पटीला नारदाने स्वत:च्या दिव्य रूपात दर्शन दिले व नंतर त्या तिघांनीही चर्पटीवर कृपा केली. चर्पटीला शंकरांच्या सांगण्यावरून दत्तांनी मच्छिंद्रासमान सर्व विद्या व सिद्धी दिल्या. नंतर 'चर्पटीनाथ' नाव देऊन त्याला तीर्थयात्रेला व योगप्रसाराला पाठविले.

चर्पटी व नारद बरोबरच निघाले. नारदाने त्याला सर्व तीर्थस्थाने दाखवून ब्रह्मलोकातही नेले. ब्रह्मदेवाने तो आपला पुत्र आहे हे ओळखून एक वर्ष स्वत:जवळ ठेवून घेतले. मग ते दोघे इंद्राकडे गेले. 'या कळलावे नारद' असे इंद्राने नारदाला म्हटले ते न आवडून नारदाने इंद्राला धडा शिकविण्याचे ठरविले. नारदाने चर्पटीनाथाला त्रिखंडात संचार करण्याचे सामर्थ्य दिले. नंतर चर्पटीनाथाला घेऊन तो नंदनवनात गेला.

नारद व चर्पटीनाथ रोज नंदनवनात जाऊन तेथील फळे यथेच्छ खाऊ लागले. एकदा तर त्यानी ब्रह्मदेवाला सुद्धा तेथील फुले नेऊन दिली. तो प्रसन्न झाला. नंदनवनातील ही फुले आहेत असे काही त्यानी ब्रह्मदेवाला सांगितले नव्हते. रोज नारद व चर्पटी नंदनवनात उच्छाद मांडत राहिले.

वनरक्षकांना नारद व चर्पटी यांचे कृत्य समजले. एक दिवस त्यानी चर्पटीला पकडले. नारद निसटला. चर्पटी व वनरक्षक यांचा झगडा झाला. त्याने व वनरक्षकांना वाताकर्षण अस्त्राने कासावीस केले. इंद्राला हे कळले. तो संतापला. देवगणांना त्याने चर्पटीवर

पाठविले. पण देवगणांसही चर्पटीने मूर्च्छित पाडले. इंद्राने शंकराचे व विष्णूचे सहाय्य घेतले. नंदनवनाच्या रक्षणासाठी ५६ कोटी देवगण चर्पटीशी युद्ध करण्यास आले. पण विष्णूला पराभूत करून चर्पटीने सुदर्शन चक्र, गदा ही त्याची आयुधे व वैजयंतीमाळ हरण करून एकदम ब्रह्मदेवापुढे जाऊन त्याला नमस्कार केला. त्याचा अचाट पराक्रम ऐकून ब्रह्मदेव त्याला घेऊन नंदनवनापाशी गेला व 'निचेष्ट पडलेल्या सर्व देवांना उठव. सृष्टीचे कार्य बंद पडून चालणार नाही' असे चर्पटीला त्याने सांगितले. चर्पटीने 'संजीवनी मंत्राने विष्णू, शंकर व सर्व देवाना उठविले. ब्रह्मदेवाने मग 'हाच पिप्पलायन ऋषी आहे' अशी चर्पटीची ओळख करून दिली.

मग नारदाने इंद्राकडे जाऊन म्हटले, "देवराज, नंदनवनाची नासधूस झाली हे कळले. फार वाईट वाटले. कोणता कळीचा नारद यावेळी आला होता ?" इंद्राने हे काम नारदाचेच आहे 'हे ओळखले! नंतर त्याने कधी नारदाला कळलाव्या म्हणून म्हटले नाही.

चर्पटीनाथ व नारद यानी त्यानंतर एक वर्ष सत्यलोकात राहून मग सर्वत्र त्रिखंडात संचार केला.

४०. देवांनाही वातकर्षण विद्या मिळाली!

इंद्राने देवगुरूंना विचारले, "ज्या वाताकर्षण विद्येने चर्पटीने देवांचे प्राण कासावीस केले, त्या विद्येची देवांना प्राप्ती कशी होईल ?" देवगुरू म्हणाले, "इंद्रा, नाथांकडून युक्तीनेच ती विद्या तुम्ही मिळवू शकाल. तू सोमयाग कर. नवनाथांना उपरिचर वसूच्या द्वारा बोलव. सर्व देवतांना बोलाव. नाथांचा मोठा सन्मान कर. मग गोड बोलून सृष्टिकार्यासाठी ती विद्या मागून घ्या."

इंद्राने मोठा सोमयाग केला. नाथांना बोलावले, त्यांचा सन्मान केला. मच्छिंद्र वेळात वेळ काढून मीननाथाला एकांतात वाताकर्षण मंत्र शिकवीत होता. मोराचे रूप घेऊन इंद्राने तो ऐकला व आत्मसात केला. पण मच्छिंद्राला हे कळले तेव्हा 'देवांना वाताकर्षण विद्येचा उपयोगच होणार नाही असा शाप त्याने दिला. इंद्राने शरण जाऊन उःशाप मागितला तेव्हा मच्छिंद्र म्हणाला, "देवांनी जर नाथपंथीयाना त्रास दिला नाही तरच देवांना ही विद्या उपयोगी होईल." तेव्हा देवांनी 'नाथपंथीयांना त्रास देणार नाही' असे मान्य केले. याग संपल्यावर नवनाथ काही वर्षे पृथ्वीवर संचार करीत राहिले व मग त्यांनी अवतारकार्य समाप्त करून विविध ठिकाणी गुप्त नामे धारण करून समाधी घेतली. इंद्राने सह्य पर्वतावर तप केले व कमंडलूत गंगेचे पाणी आणून शिखरावर सोडले त्याची पुढे इंद्रायणी नदी झाली.

अशा या नवनाथांच्या अद्भुत गोष्टी! असे होते त्यांचे पराक्रम! असा होता त्यांचा अवतार!


समाप्त


छान छान गोष्टीचे पुस्तक




















जयहिंद प्रकाशन रायकर ब्रदर्स पब्लिशिंग हाऊस प्रा.लि.

२१२, क्रिएटीव्ह, इंडस्ट्रीयल सेंटर, ना.म. जोशी मार्ग, मुंबई-११.